म. ग्रं. सं
विषय
ग्रं. नं.
विषय
संग्रहालय क्रमांक
म. ग्रं. सं. ठाणें
लेखक
सन
पुस्तकाचें नांव

# मनोरंजक

# दमयंती.

( श्रीमद्भारतांतील एके जुनाट पतिव्रतेचें चरित्र. )

हें

गणेश विनायक कानिटकर

यानीं

करून

मुंबईमध्यें

जगदीश्वर छापखान्यांत छापविलें.

आवृत्ति

१ली.

माहे एप्रील.

सन्

१८७७

शके

१७९९.

किंमत १२ आणे.

( ग्रंथ कर्त्यानें सर्व प्रकारची मालकी आपणाकडे ठेविली आहे. )

# सूचना.

कल्पीत पुस्तकें करून आजपर्यंत चार वेळां वाचकांची सेवा बजाविली. सांप्रत स्त्रीशिक्षणाचा विस्तार वाढत आहे, अशा समयीं स्त्रियांस वाचण्यास योग्य, भाषा सरळ, पातिव्रत्य संभाळण्या बद्दल पूर्ण कटाक्ष, असें असून पुराणांतील कथाभाग असावा कीं, जेणें करून त्यांस तें वाचण्याची श्रद्धा उत्पन्न होईल असें मनांत आणून सांप्रत हें पुस्तक लिहिलें आहे; यापासून त्यांस थोडा बहुत फायदा झाला असें कर्णी आल्यास कर्त्ता आपल्या श्रमाचें सार्थक झालें असें समजेल. वाचक आपला पूर्ण आश्रय देतात या बद्दल त्यांचा फार आभार आहे. परमेश्वर इच्छा असल्यास पुढील प्रसंगीं "जानकी" या नांवाचें एक सुंदर पुस्तक वाचकांचे सेवेमध्यें सादर करूं.

मुंबई, नंबर १४१ फणसवाडी. } ग. वि. कानिटकर
ता. १० एप्रील १८७७ इसवी. } ग्रं. कर्ते.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं.

# ईश्वरप्रार्थना.

## श्लोक.

प्रभु तुजविण मातें कोण देई उथारा,
हृदयघट मलानें व्यापिला जाण सारा;
विमल मतिरहि व्हाया प्रार्थितों लीन हामी,
तरि करुनि कृपा तूं रीझवीं तीस नामीं १

## आर्या.

वाटे जरि कठिण तुजहि,
धि विमल करुनि स्वनामिं वळवाया;
ने नर्कि नाम नवहें,
धजे न देवा जनासिं कळवाया. १

उक्त गमे तुज देवा,
संकट समयास भक्त ताराया;
कोण समर्थ दुजाया,
माझ्या चिंता ज्वरासि वाराया. २

हेतू सिद्धिस जाया,
भावें दिन मी नमीं तुला देवा;
पुरवुनि आशा घ्यावी,
आ दासाचीहि अल्पशी सेवा. ३

# जन प्रार्थना.

## आर्या

तुलना जुन्या कवींशीं,
नाहीं होणार माझि हें कळलें;
ईशाश्रय देइलया,
आशेनें चित्त होशिनें वळलें. १
गेला इश प्रसादें,
ग्रंथ तडीला समग्र लोकांहीं;
सुरस ग्राह्य करावा,
ग्रंथीं धुंडुनि निघेल जो काहीं. २
हा ग्रंथ स्त्रीपुरुषां,
योग्य असे निति पथास न्यायानें;
यास्तव विश्वासानें,
सेवावें भक्तिनें सदा यानें. ३
स्व पर हितास्तव मी हें,
चरित्र भार्येचि वर्णिलें गावें;
सर्वांनीं दाखविल्या,
पंथातें अनुसरोनि वागावें. ४

# मनोरंजक दमयंती.

## भाग. १ला.

सर्व स्थावर जंगमाचा नियंता जो परमेश्वर त्यातें नमन करून मी श्रीमद्भारतांतील दमयंतीची कथा लिहिण्यास प्रारंभ करितों व तोच मला वाचकांचें मनरंजन करण्याचें सामर्थ्य देवो.

पूर्वी विदर्भ देशांत भीमक राजा राज्य करीत असे त्यास तीन पुत्र, व एक कन्या दमयंती अशीं चार आपत्यें होतीं. विदर्भ देश बहुत करून सांप्रतचा वऱ्हाड प्रांत असावा. भीमक राजा परम दयालु, धार्मिक असून नीतीनें प्रजेचें पालन करीत असे. दमयंती मातापितरांची लाडकी असल्यामुळें तीस कोणत्याही गोष्टीची न्यूनता नव्हती. ती रूपानें अति लावण्य असून उपवर जाहल्यामुळें अधिकच शोभूं लागली. ज्या वेळेस तिला चांगलें समजूं लागलें त्या वेळेस तिचे मनांत आपल्याला पती कोण मिळेल कसा मिळेल हे विचार वारंवार येऊं लागले. तेणें करून ती हमेष खिन्न असे. सख्यांनीं जीव तोड तोडून विचारावें परंतु तिनें एकना दोन कांहींच बोलूं नये. अलंकार भूषणें घालूं नये. सदोदित उदास वृत्तीनें रहावें.

एके दिवशीं दमयंती पित्याजवळ दरबारांत बसली असतां एक ब्राह्मण प्राप्त झाला. राजानें त्याचा योग्य सत्कार करून देणगी दिल्या नंतर त्यानें नैषध देशच्या नळराजाची तारीफ करून ह्मटलें कीं; तो राजा कुळानें थोर, शीलानें पवित्र, रूपानें मनोहर, दयेचा तर केवळ सागर असून मोठा धार्मिक आहे. दमयंतीनें नळराजाची कीर्ति मागें पुष्कळ वेळां ऐकिली होती व आतां विप्रमुखें ऐकिल्यापासून तिच्या मनाचा

यहन्च होऊन गेला कीं, विवाह करणें तर अशा गुणवान पुरुषा बरोबरच व्हावा; परंतु तो इतके लांब रहाणारा. मजकरितां त्याजपाशीं विनंती करण्यास ही कोणी नाहीं. माझें नांव देखील त्यास ठाऊक नसेल तेव्हां हा योग घडेल कसा? वगैरे कल्पनांनीं तिची आशा अगदींच खचून जरी स्वयंवराची कडेकोट तयारी चालली होती तरी तिचा उदासपणा दिवसेंदिवस वाढतच चालला, व तेणें करून ती अगदीं झुरणीस लागली. कन्येची ही स्थिती पाहून भीमक राजाही परम कष्टी जाहला. त्यानें वैद्य पाठवून त्येच्या रोगाची परीक्षा करवावी; परंतु एकासही तिच्या रोगाचें निदान होईना. दमयंती स्वभावानें लाजाळू असल्यामुळें तिच्यानें आपला मनोरथ उघडपणें कोणाजवळ बोलवेना.

नळराजा हा नैषध देशाच्या वीरसेन राजाचा पुत्र. नैषध हा येक बंगाल्या जवळ प्रांत होता. दमयंतीच्या अलौकिक सौंदर्याची व गुणांची कीर्ति पुष्कळ वेळां यानें ऐकिली होती व तिच्या ठिकाणीं याचा प्रेम उत्पन्न झाला होता; परंतु ही गोष्ट घडेल कशी हा विचार वारंवार त्याच्या मनांत येत असे. एके दिवशीं नळ राजा हवा घेण्यास बागांत गेला असतां सुवर्णा सारिख्या कांतीचा एक हंस निद्रिस्त त्याचे पहाण्यांत आला. त्यास अवलोकन करितांच हा आपण बाळगावा अशा हेतूनें त्यास धरला. हंस नळाचे हातात सांपडल्यावर मनुष्य वाणीनें बोलूं लागला कीं, तुला धार्मिक, दयाळू, वगैरे विशेषणें लोक देतात ती त्यांची चूक आहे. मी विश्रांती स्तव आनंदानें निद्रिस्त असतां या माझ्या पंखावर लुब्ध होऊन तूं मला धरिलेंस त्यास म्यां तुझा कोणता अपराध केला होता? मग विना कारण माझ्या निद्रेचा भंग कशा साठीं केलास बरें? खरोखरच मला वाटतें कीं, या माझ्या पंखांनीं तुझ्या मनांत मोह उत्पन्न केला असावा व त्या मला नधण्या करितां धरलें असावेंस? निरपराधी प्राण्याचा घात कर



णार असा जो दुष्ट राजा त्यास नीतिमान ह्मणून जन ह्मणतें ही त्यांची चूक नाहीं काय? असो तुझ्या हातून मेलों तर सर्वच आटोपलें, परंतु जर सुटलों तर तुझ्या गुणाचा डंका या जगतांत वाजवून मला जनाची खात्री करून द्यावी लागेल. सांप्रत तुझ्या हातांत आहें जिवदान देणें अगर मारणें दोन्ही गोष्टी तुझ्या स्वाधीन आहेत; तस्मात् मर्जीस येईल तसें करून माझी सुटका कर ह्मणजे झालें.

हंसाचें हें भाषण ऐकून नळ राजा परम खिन्न झाला. त्याच्यानें एक शब्दही बोलवेना. अशा स्थितींत त्यानें त्यास सोडून दिल्हें. नळाचे हातांतून हंस सुटतांच एका वृक्षावर जाऊन बसला व आपले पंख साफ करून कांहीं वेळानें उडून येऊन नळाचे स्कंधावर बसला. नंतर तो त्यास ह्मणतो. राजा मघां मी तुला पुष्कळ अपशब्द बोललों तेणें करून तुझें अंतःकरण फार दुःखी झालें असेल तस्मात् तें तुझ्या मनांतील वाईट काढून टाकण्या करितां तुझें इच्छित कार्य करून देतों तें कोणतें ह्मणशील तर दमयंती तुला वरील असें करितों. तुझ्या बद्दल नाना प्रकारच्या गोष्टी तिला सांगून इतकी वेडी करून टाकतों कीं, अन्य पुरुषा कडे ती ढुंकून देखील पहाणार नाहीं.

हंसाचे तोंडचें हें भाषण ऐकून नळ राजास किती आनंद झाला असेल बरें? त्यानें हंसाचा उपकार मानून त्यास ह्मटलें कीं, तुह्मीं तिजकडे जाऊन माझ्या गुणाचें व सौंदर्याचें वर्णन करावें. सारांश कोणी कडून मला ती लवकर प्राप्त होईल अशी तजवीज करून मला लवकर परत येऊन भेट! जा बाजा! आतां विलंब करूं नको, असें ह्मणून त्यास निरोप दिला. तो हंस आपले बरोबर दुसरे कित्ती एक आपल्या मित्रांस घेऊन विदर्भ देशाचा मार्ग क्रमूं लागला.

इकडे दमयंती मनाला कांहीं विश्रांती वाटण्या करितां एके दि-

वगैरे मैत्रिणी सह वर्तमान प्रमद वनांत प्राप्त झाली. कांहीं वेळ पर्यंत वनाची शोभा अवलोकन केल्या नंतर एका वृक्षा खालीं बसली असतां सुवर्णा सारिख्या कांतीचे कित्येक हंस तेथें प्राप्त झाले. हंस बहुधा दृष्टीस पडण्याची पंचाईत त्यांतून हे तर सुवर्णा सारिख्या कांतीचे असून पूर्वी कधीं पाहिले नाहींत असे असल्या मुळें त्यांतून एकादा धरून पिंजऱ्यांत ठेवावा अशी दमयंतीची इच्छा होऊन ती त्या उद्योगा कडे लागली. तिचा धरण्याचा भाव पाहून हंस दूर पळूं लागले. तेव्हां ती सख्यांस ह्मणते, मैत्रिणींनो! यांतून एकादा हंस धरून महालीं ठेवावा अशी इच्छा माझे मनांत उत्पन्न झाली आहे यास्तव कसेंतरीं करून एकास तर धरूंया.

इतक्यांत त्यांतील एक हंस दमयंतीच्या जवळ येऊं लागला. दमयंतीनें त्यास धरण्या करितां आपल्या हारांतील कांहीं मोत्यें काढून एके हातांत धरलीं व "आ,आ" करूं लागली. हंस पुढें व दमयंती मागें असें होतां होतां दमयंतीच्या सर्व मैत्रिणी मागें राहिल्यासें पाहून तो तिच्या हातीं सांपडला. हंस हातीं सांपडल्या वर मग दमयंतीच्या आनंदास काय विचारावयाचें आहे ? तिनें आपला सुकुमार हात त्याचे अंगा वरून फिरवून फडक्याची एक चिंधी फाडली आणि आतां ती त्याचा पाय बांधणार इतक्यांत हंस मनुष्य वाणीनें दमयंतीची प्रार्थना करितो.

**हंस** - दमयंती! या वेळेस जर तूं कृपा करून मला सोडशील तर तुझ्या उपकारा बद्दल तुझें इच्छित कार्य खचित साधून देईन. पहा! नळा सारिखा पवित्र, धार्मिक, दयाळु, रूपवान्, असा राजा या भूमंडळावर एकही नसेल तो तुला पति करून देईन, हें मी शपत वाहून सांगतों तें खरें मान. बाई दमयंती नळा सारखा तुला दुसरा पति मि



ळावयाचा नाहीं; व तो मिळवून देण्याचें काम मज वांचून इतराच्यानें घडणार नाहीं. मी खरोखर तुला सांगतों कीं, तूं आपणास सुखी करून घेण्यास इच्छित असलीस तर नळा बरोबर विवाह कर. कारण जो पुरुष नळ नव्हे तो अनळ (अग्नि) आहे तेव्हां त्याज बरोबर विवाह केल्यास सुखाची प्राप्ति कोठून होणार? दमयंती! काय त्याच्या गुणांची तारीफ करूं? खरोखर तूं माझें ऐक व त्यासच पति कर.

**दमयंती** - (हंसाचें चातुर्याचें भाषण ऐकून) एवढें कोठें बाबा माझें नशीब जोरावर आहे? कीं, तूं ह्मणतोस तशी गोष्ट सहज घडून यावी.

**हंस** - बाई दमयंती! तुला कोणती शंका आली तेवढी जर सांगशील तर तिचें समाधान मी करितों.

**दमयंती** - हंसा काय रे बाबा सांगूं? माझ्या नशीबाच्या साऱ्या शंकाच झाल्या आहेत. तूं ह्मणतोस या सर्व गोष्टी खऱ्या. तूं जाऊन मज विषयीं त्यास सांगशील हेंही खरें, पण त्यांस माझी ओळख देखील नसेल. त्यांच्या गुणांवर व थोर पणावर लुब्ध होऊन शेंकडों राजकन्या हातांत आरत्या घेऊन एका पायावर तपश्चर्या करीत असतील. तस्मात् त्यांची यःकश्चित मजवर कशी भरें कृपा होईल? बा हंसा! खरेंच सांग कसें बरें हें होईल?

**हंस** - दमयंती! तुला काय अजून संशयच वाटत आहे? अग विचार कर. आकाशांत उडणारे पक्षी आज पर्यंत मनुष्य वाणीनें बोलतांना कधीं तरी ऐकिले आहेस काय? मग अशा सुवर्ण देहाचे हंसानें तुज विषयीं रदबदली केल्या वर नळ तर काय! साक्षात् इंद्राचेंही मन वळवीन. मग तुला एवढा संशय तो काय वाटतो. मी खात्रीनें सांगतों, तुझी तारीफ नळा जवळ इतकी करीन कीं, त्यास तुज करितां अ

गदीं वेडा करून सोडतों· बाई दमयंती स्वस्थ रहा· तुझें कार्य झालें असें समज·

**दमयंती**· ( कंठदाटून येतो· ) बाबा हंसा! तुझा उपकार तरी मी कसा फेडूं? आज तूं प्रत्यक्ष ईश्वरच भेटलास असें समजलें पाहिजे· पहा पुष्कळ दिवस झाले त्यांची कीर्ति ऐकून मी मोहित झाल्यें आहें· परंतु उपाय काय? मन मात्र वेडें ह्मणून नाना प्रकारच्या कल्पना करितें एरवीं माझी निराशाच झाली होती; परंतु परमेश्वरास माझी दया येऊन त्यानेंच तुला पाठविलें असें ह्मटलें पाहिजे· तर तूं आतां कृपा करून माझी हात जोडून विनंती तिकडे सांग व ते माझा स्वीकार करतील असें कर· हंसा, तूं स्वर्गांतील रहाणारा तस्मात् तुला देवच समजलें पाहिजे ह्मणून मी तुझ्या पायां पडत्यें· नळा वांचून हा देह इतरांच्या स्वाधीन होणार नाहीं· समयीं प्राणत्यागही करीन· याची तूं आठवण ठेव आणि करणें असेल तें कर· हंसा! कसेंही करून माझें कार्य साधून दे· जा बा लवकर आतां विलंब करूं नको·

या प्रमाणें दमयंतीचा व हंसाचा संवाद होऊन हंस नळराजाकडे येण्यास निघाला· व दमयंती आपल्या मैत्रिणी सहवर्तमान महालीं आली· तिची वृत्ति कांहींशी आनंदांत असून रोजच्या सारखी उदास नाहीं असें पाहून सख्यांनीं तीस असें होण्याचें कारण विचारिलें; परंतु तिनें एकना दोन बोलूं नये· इकडे हंसानें नळराजाजवळ जाऊन दमयंतीकडील वृत्तनिवेदन करून त्यास वेडा करून टाकिला· नळास ध्यानीं मनीं दमयंती भासूं लागली· या प्रमाणें चाललें असतां दमयंतीच्या स्वयंवराची पत्रिका येऊन पोंचली· तेव्हां नळराजा तीस वरण्या करितां निघाला तों मार्गांत इंद्र, यमधर्म, वरुण, व अग्नी असे चार देव भेटले· त्यांनीं नळास आमचें काम करीन असें



वचन देण्यास आग्रह केल्या वरून त्याणें वचन दिलें· तेव्हां देव त्यास ह्मणतात·

बाबारे! त्वां दमयंती कडे आमचा जासुद होऊन जावेंस, व आमचें ऐश्वर्य आणि गुण सांगून आम्हां पैकीं एकास तिनें वरावें असें कर· देवांच्या तोंडचीं हीं अक्षरें ऐकतांच नळास काय वाटलें असेल याचें अनुमान वाचणार सहज करितील· जिचे प्राप्तीची आशा धरून आपण जात आहों तिजबद्दल दुसऱ्याचा दुत होऊन जाऊन त्यांची तारिफ करणें आपणास लघुत्व आणील असें जरी नळास वाटलें तथापि वचन बद्ध जहाल्या मुळें त्याच्यानें नाहीं ह्मणवेना· देवाचा आशिर्वाद घेऊन नळ तेथून निघाला तो विदर्भ देशाचा मार्ग क्रमूं लागला·

एके दिवशीं दमयंती आपल्या मैत्रिणी सहवर्तमान बुद्धिबळांचा खेळ खेळत असतां तिच्या हृदयांत ठसून गेलेला जो नळराजा तो अकस्मात् पुढें येऊन उभा राहिला· त्याला पहातांच सर्व मुली मोठ्या मर्यादेनें बाजूस जाऊन उभ्या राहिल्या· त्याची ती सौम्य मुद्रा पाहून त्याज बरोबर बोलण्यास कोणी पुढें होईना· तेव्हां दमयंती पुढें येऊन मोठ्या नम्रतेनें ह्मणते!

**दमयंती**· महाराज! आपण कोठील कोण अहां? आपलें नांव काय व येथें कशा करितां प्राप्त झालां हें सर्व कृपा करून सांगावें?

**नळराजा**· सुंदरी! निषध देशाचा राजा मला "नल" असें ह्मणतात सांप्रत येण्याचें कारण काय ह्मणशील तर मी देवांचा दुत होऊन मध्यस्थी करण्या करितां आलों आहें· ज्याणें शंभर यज्ञ करून सर्व देवांचें राज्यपद मिळविलें असा इंद्र, संपूर्ण प्राणि मात्रांस आपल्या पाशांनीं आकर्षण करणार असा यमधर्म, संपूर्ण उदकाचा स्वामी असा वरुण, व सर्व जगास पवित्र करणार असा अग्नी, असे च्यार

देव तुझ्या गायीं मोहित झाले आहेत, आणि तुला उपदेश करण्याकरितांच त्यांणीं मला इकडे पाठविलें आहे. तर मजवर कृपा करून चवघां पैकीं तुझ्या इच्छेस येईल त्यास त्वां वरावें अशी मी प्रार्थना करितों. दमयंती! थोर नशीब समज कीं, तुझ्या प्राप्तीस्तव स्वर्गींचे देव लुब्ध होऊन मध्यस्ती करवित आहेत तस्मात् कसेंही करून त्यांतून एकास वरून तूं आपणास जन्माचें सुखी करून घ्यावेंस. ह्मणजे मी ही मध्यस्ती केल्याचें सार्थक होईल.

**दमयंती.** (हासून). महाराज! एकाद्या अभाग्याला कामधेनु लाधली असतां तो तिचा त्याग करून धेनु घेईल काय? एकाद्या दरिद्याला परिस प्राप्त झाला असतां तो टाकून गारगोटी तो घेईल काय? एकाद्या क्षुधितास मिष्टान्न भोजन मिळालें असतां ते सोडून तो भाकर स्वीकारील काय? असें जर आहे तर मग आपण मला उपदेश करतां हा किती बरें योग्य आहे? विप्रमुखानें व हंसमुखानें आपले नांव ऐकिल्या पासून "नळराज, नळराज," अशी जपमाळ घेऊन बसले. हंसा बरोबर पुष्कळ प्रकारें विनवणी सांगून पाठविली. महाराजांस येण्यास कांहीं तरी निमित्त पाहिजे ह्मणून पित्या कडून स्वयंवराची योजना करून देशोदेशींचे राजे मिळविले याचें कारण या पायांच्या जोडी वांचून अन्य कांहीं नाहीं. तस्मात् या माझ्या बोलण्यावर एक शब्द न बोलतां दासीस पदरीं घेऊन जन्माचें सार्थक करावें.

**नळ.** दमयंती! सर्व गोष्टी खऱ्या आहेत; परंतु सांप्रत मी देवांचा दूत होऊन आलों असतां तां जर मीच तुझा स्वीकार केला तर मला विश्वास घातकी असें सर्व जग ह्मणेल. दुसरे देवांपेक्षां तुझी प्रीति मजवर अधिक बसण्यास ही कांहीं कारण नाहीं. पहा त्यांच्या आणि माझ्या पराक्रमाची, वैभवाची, अथवा रूपाची तुलना केली असतां त्यांजपुढें



माझें नांव देखील काढणें योग्य होणार नाहीं. असें असतांना त्यांस सोडून तूं मलाच वरण्याविषयीं इतका आग्रह धरतेस याचा हेतु काय असावा बरें? मी तुला पुनः सांगतों. मजपेक्षां देवांस वरल्यानें तुला अधिक सुख होईल. यास्तव पोक्त विचार करून करणें तें करावें अशी मी विनंती करितों.

**दमयंती.** महाराज! आपण परम विचारवंत आहां, आपल्यास उपदेश करणें मला योग्य नव्हे. आपण ह्मणतां त्या सर्व गोष्टी खऱ्या, परंतु क्षमा मागून थोडेंसें बोलतें. आज्ञा असावी. मनाचा जो निश्चय जाहला त्या वेगळी कोणतीही गोष्ट करणें पाप आहे असें मला वाटतें. मी आपली कीर्ति ऐकिल्या वेळे पासून मनाचा निग्रहच केला आहे कीं, ही दमयंती (त्याच्या पायांकडे बोट दाखवून) या चरणांची दासी आहे. आपल्या वांचून अन्य पुरुष पिता बंधू प्रमाणें आहेत. तस्मात् आतां आपल्या उपदेशानें किंवा त्यांच्या थोरपणाच्या किंवा रूपाच्या लोभानें भुलून जर मी त्यांस वरलें तर माझें पातिव्रत्य कसें बरें राहील? आतां मी फार बोलत नाहीं. आपण माझ्या विनंतीचा अनादर केल्यास प्राणहत्यापाप न करितां ब्रह्मचर्य व्रतानें आत्म्याचें शोषण करीन. याउपर जशी महाराजांची इच्छा असेल तसें करावें.

**नळ.** दमयंती, तुझ्या या निष्कृण भाषणापुढें माझ्यानें कांहीं बोलवत नाहीं; तर मजवर विश्वासघाताचा दोष न देतां जशी आज्ञा करशील तसें वर्तन करण्यास मी सिद्ध आहें.

**दमयंती.** त्याची व्यवस्था मी आधींच करून ठेविली आहे. उद्यां स्वयंवर आहे त्या वेळीं आपण सभेंत येऊन बसावें ह्मणजे सर्वांसमक्ष मी आपणास माळ घालीन मग तर आपणावर कोणाचाच दोष नाहीं नां? शेवटीं इतकीच विनंती आहे कीं, कोणत्याही भीतीनें दासीचा

अव्हेर न करितां सुख देणें महाराजांचे हातीं आहे.

या प्रमाणें संभाषण झाल्यावर नळ तेथून निघून देवांकडे प्राप्त झाला व घडलेली सर्व हकीकत निवेदन केली, तेव्हां देव रागावून ह्मणाले कीं, देवाच्या विनंतीचा अव्हेर करून दमयंती मनुष्यास वरणार काय? चिंता नाहीं तिला देवांचें सामर्थ्य काय तें समजलें पाहिजे. असें ह्मणून चवघांनीं नळ रूपानेंच स्वयंवरास जाण्याचा निश्चय करून चालते जहाले.

दुसरे दिवशीं भीमक राजानें दमयंतीच्या स्वयंवराचा थाट केला. निमंत्रण करून आणलेले राजे, आपापल्या योग्यते प्रमाणें बसले आहेत. मंगल वाद्यें वाजत आहेत, वारांगना नृत्य करीत आहेत, नगरस्त्रिया मंगलाक्षता घेऊन उभ्या आहेत अशा समारंभांत साध्वी दमयंती भरजरी बारिक शालू नेसली असून शरीराचा बांधा सडपातळ, तेजःपुंज, वर्ण तर सुवर्णास ही लज्जित करण्या सारिखा, अरुण प्रभे समान जिची कांती, सिंहा सारिखी कटी, सुहास्य वदना, सरळ नासिका, मृग नयना असून जिची भृकुटी धनुष्याकार, वेणी नागाकृती असून हस्त पाद कोमल, बोटें सडक, नखांवर तर जणूं चंद्राचें तेज ओतलें आहे कीं काय? ओंठ पिकलेल्या तोंडल्या सारिखे लाल असून शरीरावर लिंबा प्रमाणें टवटवी मारीत आहे अशी ती सुहास्य वदना दमयंती हातांत मोतियाचा रत्नखचित हार घेऊन मनास योग्य वाटलेल्या पतीस वरण्या करितां प्राप्त झाली. दमयंतीला पहातांच प्रत्येक राजानें तिणें आपणास भुलावें ह्मणून प्रयत्न केले, परंतु उपयोग काय? तिचें सर्व लक्ष नळ राजावर होतें. समयीं देव हळु हळु तिनें सर्व राजे मंडपांत पाहिले; परंतु तिचा प्राणप्रिय नल कोठें दिसला नाहीं; ह्मणून विचार करीत आहे इतक्यांत पांच नळांची एक ओळ तिच्या दृष्टीस पडली.



सर्व एक सारखे तेव्हां यांत खरा नल कोणता ह्मणून बिचारी पतिव्रता विचार करीत असतांनां तिला कांहींच सुचेनासें झालें, इतका प्रयत्न करून ही इच्छित पतीची प्राप्ति होत नाहीं असें पाहून तिचा धीर अगदींच खचून गेला. लज्जे मुळें उघडपणें बोलतां येईना अशा संकट समयीं परमेश्वरा वांचून कोणी त्राता नाहीं असें मनांत आणून तिनें दीन वाणीनें त्याची स्तुति आरंभिली.

परमेश्वरा! मी अज्ञान असतांनां मजवर तुझा इतका रोष कांबरें व्हावा? सांप्रत मी कोणत्याही पाप कर्मास आरंभ केला नाहीं. मी आपल्या मर्जीनुरूप ज्या नल राजास हा देह अर्पण केला त्याचें स्वरूप आणखीं च्यार कपटी धरून बसले आहेत. भगवंता! तुझ्या नियमा प्रमाणें मी निषध देशच्या नलराजाची दासी झालें असतां माझ्या स्वयंवरास हा अडथळा कशा करितां बरें? नारायणा! तूं न्यायी असतां हा अन्याय तुला कसा पहावचतो? असा मी कोणता अपराध केला होता कीं, त्याच्या शिक्षेस हाच प्रसंग तुला उक्त दिसला? देवहो! मी तुह्मांस शरण आहें. तुमच्या निरोपाचा अनादर केला म्हणून तुह्मीं रागावलां आहां हें मी जाणतें, पण काय करूं? निषधपति नलराजा शिवाय इतर सर्व पुरुष मला पिता बंधू प्रमाणें आहेत असा माझा निरधार आहे. महाराज! आपण जर आपलीं कपटी रूपें सोडून दिलीं नाहींत तर माझा विवाहच होणार नाहीं, पापाच्या भीतीनें प्राणहत्या करणार नाहीं; ब्रह्मचर्य व्रतानें आत्म्यास दुःख देईन. देव हो! तुमचा मज अनाथ स्त्रीवर इतका राग कां बरें? तर आतां तुमचा निरोप अमान्य केला म्हणून तुमच्या पायां पडतें, पदर पसरतें, नाक दुराई काढतें, तर आतां अंत न पहातां मला माझा पति दाखवा.

या प्रमाणें दमयंतीची मानसिक स्तुति श्रवण करून त्यारही कप

टी नल एकदम उठले, व नलदमयंतीस आशीर्वाद देऊन आपल्या मागानें चालते झाले.

या प्रकारें देवांनीं आपापलीं रूपें प्रगट करतांच दमयंतीनें हातांतील हार मोठ्या आनंदानें नलाचे गळ्यांत घातला आणि लज्जेनें मान खालीं घालून उभी राहिली. असें पाहून नलानेंही आपल्या आसना वरून उठून तिचा हात धरून ह्मटलें. " सुंदरी ! माझ्या ठायीं पूर्ण प्रेम धारण करून होतीस आणि या समाजांत तूं मला भक्तीनें वरिलेंस तर मीही प्रतिज्ञा पूर्वक सांगतों कीं, जों पर्यंत माझ्या शरीरांत प्राण आहे तों पर्यंत धर्म, अर्थ, आणि काम यांमध्यें तुझी योजना करीन, ही माझी प्रतिज्ञा परमेश्वर पूर्ण करो. असें ह्मणून त्यानें तिचें पाणि ग्रहण केलें. पुरोहिताचे आज्ञे वरून उभयतां स्त्री पुरुषें एकासनीं बसलीं हें पाहून जमलेल्या सर्व राजांनीं आपसांमध्यें दुःखाचा सुसकारा टाकिला. ऋषी आणि देव यांनीं "शाबास पतिव्रते, परमेश्वर तुह्मांस अखंड सुखी करो" असा आशीर्वाद दिला. मंडपांत मंगल वाद्यांचा गजर होऊं लागला. राजा भीमक ही मोठ्या आनंदानें विवाहाच्या उत्तर विधीची तयारी करूं लागला. वधूवरांनीं देव, ऋषी, वृद्ध, यांस अनुक्रमें नमस्कार केले. च्यारी देव दमयंतीच्या प्राप्तीस्तव आले होते; परंतु यांचें हें जोडपें यथाप्रीति पाहून प्रत्येकानें प्रसन्न होऊन नलराजास दोन दोन आशीर्वाद दिले. यज्ञामध्यें आपलें प्रत्यक्ष दर्शन आणि अंतीं उत्तम गति असे इंद्रानें, पाहिजे त्यावेळेस अग्नीची उत्पत्ती, व शौर्यामध्यें अग्नी सारखें प्रखर तेज असे अग्नीनें. धर्माच्या ठिकाणीं भक्ती व पाहिजे तसें नलानें अन्न तयार केलें असतां तें अमृता प्रमाणें व्हावें असें यमधर्मानें, सर्वकाळ उदकावर सत्ता व कधींही न कोमणारी अशी एक विजयमाळा वरुणानें दिली. सर्व नगरांत गुढ्या तोरणें, आनंदप्रदर्शक वाद्यांचे गजर सुरू झाले. हजारों याचकांच्या इच्छा तृप्त केल्या. या प्रमाणें समारंभ जहाल्या नंतर भी



मक राजानें दमयंती सह नलराजाची रवानगी ... अलंकार, भूषणें, रथ, हत्ती वगैरे पुष्कळ आंदणें दिलीं. नलराजानें स्वनगरांत आल्यावर मोठा उत्साव केला. या प्रमाणें आपलीं नलदमयंती नामक स्त्री पुरुषें आनंदानें काल क्रमूं लागलीं.

पुढें कांहीं दिवसांनीं दमयंतीस गर्भ राहून एक सुंदर पुत्र जाहला, त्याचें नांव इंद्रसेन असें ठेविलें. पुत्र झाल्यावर मग त्या आनंदास काय विचारावयाचें आहे? नल राजानें सर्व नगरींत मोठा उत्साह केला. हजारों लोकांस इच्छा भोजनें दिलीं. लाखों रुपये खर्च करून याचक तृप्त केले. बंदीजनाचे बंद मुक्त केले. पुढें कांहीं दिवसांनीं दुसरी एक कन्या झाली तिचें नांव इंद्रसेना असें ठेविलें. वाचणारे हो! येथून तुह्मांस पुढें वाईट वाटण्या सारखें सांगण्याचा प्रसंग मजवर आला आहे; परंतु त्या पासून आपणांस दोन फायदे उत्पन्न होतात; यास्तव कठोर अंतःकरण करून पुर्ण पणानें लक्ष द्या.

नलदमयंतीस आशिर्वाद देऊन देव स्वर्गास जात असतां वाटेंत कली आणि द्वापार यांची गांठ पडली त्यांस पाहून इंद्रानें कलीस विचारिलें.

**इंद्र.** वा कले! आज उभयतां मिळून कोणी कडे स्वाऱ्या जात आहेत?

**कली.** दमयंती नांवाच्या राजकन्येचें आज स्वयंवर आहे त्यास तिला वरण्याचे हेतूनें आम्हीं तिकडे जात आहों.

**इंद्र.** अरे! तें स्वयंवर केव्हांच आटोपलें, आम्ही सर्व तिकडेच गेलों होतों आह्मां समक्ष तिनें निषध देशाच्या नलराजाचा स्वीकार केला. आतां व्यर्थ हेलपाटा कां घेतोस? चला परत जाऊं.

**कली.** (आश्चर्य पाहून) काय तिनें देवांस सोडून नलास वरिलें काय? चिंता नाहीं आतां पाहून घेतों, तिला चांगली शिक्षाच केली पाहिजे. एरव्हीं देवांचा पराक्रम काय हें तिला समजणार नाहीं.

**इंद्र**–तिनें नलास वरिलें यांत तिचा अपराध तो कोणता? जर न वरती तर मा
भ खरोखर वेडेपणा झाला असता· अरे! सर्व विद्येंत निपुण, रूपानें लावण्य,
शिलानें पवित्र, बळानें तेजस्वी, यत्न करून देवांस व पितरांस सतत तृप्त क
रणारा, हिंसा तर त्यांच्या स्वप्नींही नसेल, प्रजापालना विषयीं तत्पर, शत्रुनि-
र्भेदन पणानें पूर्ण, असा परम पवित्र नलराजा टाकून अन्य पुरुषावर कोणती
स्त्रि बरें मोहित होणार आहे? मग दमयंतीनें त्यास वरिलें यांत कोणता बरें
अपराध केला? आम्हीं खात्रीनें सांगतों कीं, नला सारख्या पवित्र प्राण्यास
दुःख देण्याची इच्छा धरणार महापापी या त्रिभुवनांत ही सांपडेल असें आ
म्हांस वाटत नाहीं· मध्यान्हींच्या सूर्यावर थुंकणाराचा थुंका जसा त्याच्याच
तोंडावर पडतो त्या प्रमाणें नलास दुःख देण्या विषयीं प्रयत्न करणारा आ
पला स्वतांचाच घात करून घेईल· आमच्या मतें दमयंतीनें नलास वरिलें
ही गोष्ट फार उत्तम केली· नला सारिखा पवित्र राजा या त्रिभुवनांत सांपडणें
विरळ· (असें ह्मणून देवांसह निघून जातो·)

इतकें भाषण जरी झालें तरी नलाचा छल करण्याचा जो कलीचा
हेतु तो रहित होईना· त्यानें आपला सोबती जो द्वापार त्यास भर देऊन
नलाचा छल करण्याची युक्ति आरंभिली· बारा वर्षें यत्न करीत असतां ए
के दिवशीं नल पाय धुवून संध्येस बसला; परंतु स्मरण नसल्या मुळें पा
याचा आंगठा थोडा कोरडा राहिला· एवढें निमित्त पाहून कलीनें नलाच्या
शरिरांत प्रवेश केला, व आपण दुसरें रूप घेऊन द्वापारास संकेता प्रमा
णें फांसे बनावून पुष्करा कडे पाठविला· पुष्कर हा नळाचा भाऊबंद होता·
द्वापारानें जाऊन त्यास अशी भर दिली कीं, तूं नलाचा भाऊ व राज्याचा
मालक असतां साधूंच्या आश्रमांत पडून व्यर्थ दिवस कां काटतोस? पुष्क
रानें गृहस्थाश्रम सोडून साधूसंतांच्या मंडळींत बराच काळ घालविल्या
मुळें त्यास हें ह्मणणें बरें वाटेना· त्यानें विचार करून ह्मटलें कीं, नल



माझा बंधू आहे तस्मात् त्यानें राज्य केलें काय व मी केलें काय एकच· पु
ष्करानें हें भाषण ऐकून द्वापार त्यास अधिक भर देऊं लागला· शेवटीं निरु
पाय होऊन त्यास त्याचें बोलणें कबूल करणें प्राप्त झालें· तेव्हां उभयतांच्या
मतें मसलत ठरली कीं, नळराजाकडे जाऊन द्युत खेळण्याची गोष्ट काढावी·
त्यानें त्यास अनुमोदन पडल्यावर खेळ सुरू करून त्यास जिंकावें· सर्व रा
ज्य आपल्या स्वाधीन झाल्यावर त्यास राज्यांतून हांकून द्यावें. या प्रमाणें
त्याची दुर्दशा करावी, असा निश्चय करून तेथून निघाले ते नल राजा कडे
प्राप्त झाले· नलास कळलें कीं, पुष्कर प्राप्त जहाला आहे ह्मणून तो आपल्या
धर्मा प्रमाणें त्याचें आगत स्वागत करण्या करितां पुढें गेला·

पुष्कराचा हेतु दुसरा असल्या मुळें त्यास असें झालें कीं, खेळांत जिंक
तों केव्हां, व गादीवर बसतों केव्हां· शेवटीं स्पष्टपणें त्यानें द्युत खेळण्या
ची आपली इच्छा नलास प्रदर्शित केली· नल कलि प्रवेशानें बुद्धिभ्रष्ट झाला
च होता ह्मणून त्यानें लागलेंच अनुमोदन दिलें· द्युत खेळत असतां प्रत्येक
डाव पुष्कर जिंकी· असें होतां होतां बहुत करून सर्व संपत्ति तर नष्ट झाली·
राजा द्युत खेळत आहे ही बातमी नगरींत पसरतांच प्रजाजन राजास उपदे-
श करण्या करितां प्राप्त झाले; व पहातात तों राजाची दिरष्टी गाढत जात
असून कोणा एका कडेही पहात नाहीं; अशी स्थिति पाहून प्रजाजन मो
ठ्या आर्जवानें त्याची प्रार्थना करून ह्मणतातः—

**प्रजाजन**· महाराज! कृपा करून क्षणभर डाव बंद करून आमचें ऐ
का· महाराज! आपण परम न्यायी, दयाळु असतांनां आज इतकें कठोर
अंतःकरण कशा करितां केलेंत? महाराज! द्युत हें नीच कर्म आहे, जाणून
दरबारांत द्युत कर लोकांस आपण मोठी शिक्षा करीत होतां त्याच नीच
कर्मास आपण स्वतः कसे प्रवृत्त होतां? विचार करा· संपत्ति तर नष्ट होऊन
हें राज्य देखील आतां जाण्याच्या बेतांत आहे· महाराज! सावध व्हा· झाले

तेवढें पुरे. आतां तरी हात आटोपा. आपल्या मागें आमची काय व्यवस्था होईल याचा विचार करा. आमचें न्यायानें पालन कोण करील? प्रभो! आपल्या पूर्वजांच्या नांवाकडे व आपल्या स्वच्छ कीर्तीकडे पाहून तरी खेळ सोडा. आम्हां दीनांनीं मग कोणाच्या बरें तोंडाकडे पहावें? राजाधिराज! द्यूतापासून कोणी सुखी झाला नाहीं; असें असतां आपण त्याचीच कर्मांत एवढे मग्न होऊन कां गेलां अहो? महाराज! कांहीं वेळानें या राज्याशीं आपला संबंध रहाणार नाहीं असा रंग दिसतो याचा विचार करा. आम्हांस वाटतें कीं, आपणांस आमचा कंटाळा आला असावा, म्हणूनच आपण आमचा त्याग करण्याच्या हेतूनें हें कृत्य आरंभिलें असावें. पण नाहीं, प्रभो! आपल्या हातून अशी गोष्ट होणें नाहीं. महाराज! उठा, उठा, आतां येथून उठा. अंमळ पुढें जातात. )

**नल.** येथें आतां गडबड करण्याचें कारण नाहीं. मी यावेळीं कोणाचें ऐकणार नाहीं. चला जा येथून.

नलाचें या प्रकारचें भाषण ऐकून प्रजाजन कष्टी होऊन परत गेले. या प्रमाणें राजाची स्थिति पाहून प्रधानानीं हें वर्तमान दमयंतीस कळविलें. तेव्हां दमयंती मोठ्या आर्जवानें राजाची प्रार्थना करून म्हणते.

**दमयंती.** महाराज! झालें तेवढें पुरे. आतांतरी विचार करा. प्रजाजन प्राप्त झाले असून आपल्या भेटीची इच्छा करीत आहेत त्यांस एकवार दर्शन द्या. नैषधनाथ! आपण सूज्ञ असतांनां या पाप कर्मास कसे प्रवृत्त झालां? राजेश्वरा! या लहान बाळांकडे पहा. आपली दुर्दशा जाहल्यावर यांनीं कोणाच्या तोंडाकडे पहावें बरें? प्राणनाथ! खजीना तर सर्व भरीस गेला याचा विचार करा, द डाव आटोपा. (कंठ दाटून येतो.)

या प्रमाणें तिनें मोठ्या दुःख वेगानें पुष्कळ प्रकारें विनवणी केली; परंतु कलि पाशानें बद्ध जहालेल्या नलानें एकही प्रत्युत्तर दिलें नाहीं. सर्व



लोक आपापल्या मनांत दुःखित होत्साते परत गेले. दमयंतीनें वारंवार द्वारापाशीं जाऊन दीन स्वरानें त्याची प्रार्थना करावी; परंतु उपयोग काय? त्यानें उत्तर न दिलें म्हणजे तिला हिरमुसल्या तोंडानें परत जावें लागे. आतां आपल्या यत्नास कोणत्याही प्रकारें सिद्धीच नाहीं अशी जेव्हां खात्री जहाली तेव्हां तीस कांहींच सुचेनासें झालें.

वाचकहो! स्त्री सुशिक्षित असल्या मुळें किती फायदे होतात याचें अनुमान दमयंती वरून करा. दमयंतीनें धात्री नांवाच्या आपल्या विश्वासु व चतुर दासीस बलावून प्रधान मंडळ जमविण्यास सांगितलें. प्रधान मंडळ दृष्टीस पडतांच मोठ्या गंभीर पणानें ती त्यांस म्हणाली: "बाबानों! राज्याची सर्व इमारत प्रधानावर असते. फक्त निमित्त्यास मात्र राजा. त्या प्रमाणें तुम्हीं हें राज्य आजपर्यंत सुरक्षित चालविलें. सांप्रत आमचें प्रारब्ध चमत्कारिक दिसत आहे. दैवगतीनें तुमचे महाराज अगदीं भ्रमिष्ट जहाले आहेत तें तुम्हीं जाणतांच, तर आतां या राज्याचें रक्षण करणें तुमच्या हातीं आहे. माझें मत असें आहे कीं, तुम्हीं सर्वांनीं जामदार खान्याचे हिशेब आतांच घेऊन जावे. आणि आतां शिलक राहिली नाहीं असें सांगून महाराजांस तेथून उठवून आणावें, अंतरगृहांत आल्यावर मग तुम्हांस काळजी नको."

या प्रमाणें पोक्त व राजनीतीस अनुसरून असें तिचें भाषण ऐकतांच सर्व प्रधान मंडळ टळटळां रडूं लागलें. त्यांच्यानें एक अक्षरही पुढें बोलवेना. अहारे धनीन म्हणून वारंवार प्रेमाचें भरतें दाटे. आज्ञा मान्य असें म्हणून ते राज सभेंत गेले, आणि आपल्या कडून होता तेवढा प्रयत्न केला; परंतु कांहींच उपयोग झाला नाहीं. महाराजांचे पगडे बारा कायमच आहेत. दमयंतीनें द्वारामागें उभें राहून सर्व पाहिलेंच होतें. प्रधान मंडळाचें कांहीं चालत नाहीं असें जेव्हां तिनें पाहिलें तेव्हां तिनें इकडील सर्व नाद सोडून

आटोपा आटोपीस प्रारंभ केला.

प्रधान मंडळास प्रजा रक्षणा विषयीं सांगीतलें. फकाशिनी, अनाथ, पंगू वगैरे दानपात्र लोकांस बोलावून सर्व खासगी खजीना धर्म केला; व आपल्या विश्वासू दाशीस ह्मणाली, बाई! आतां कांहीं बरीगत दिसत नाहीं. सर्व खजीना तर पणाच्या प्रीस घातला, शेवटीं माझ्या खजीन्या वर पाळी येणार. असा जाणार तसा जाणार मग धर्म करून कां घालवूं नये? उगीच तेवढा पुण्याचा वांटा कामीं पडेल. दासी! मी आतां यजमानीण व तूं चाकर हा भेद थोडक्याच वेळानें नाहींसा होईल. तर आतां आह्मांवर कृपा करून आह्मां पासूनजीं दुःखें तुलासोसावीं लागलीं असतील त्यांची क्षमा कर! आतां आह्मास जितकें साह्य कराल तितकें उपयोगाचें आहे. हा दुष्ट फाशांचा नाद मला ऐकवत देखील नाहीं; यास्तव होईल तेवढी त्वरा करून व्यवस्था केली पाहिजे, यास्तव लवकर जाऊन वार्ष्णेयास घेऊन ये.

दमयंतीची आज्ञा होतांच दासीनें त्यास बोलावून आणला त्यास पाहून दमयंती ह्मणते, बा वार्ष्णेया! महाराजांचे गुण तुला ठाउक आहेतच. भूत दया, बल, शोर्य, सत्यभाषण इत्यादि गुण ऐकून स्वर्गीचे देवही माना डोलवितात, त्या तुझ्या महाराजांवर सांप्रत भयंकर प्रसंग आला आहे. महाराजांस पुष्कळ प्रकारें विनविलें; परंतु उत्तर देखील देत नाहींत आतां कायरे करूं? आतां थोडक्याच वेळांत आमचा या नगराशीं, प्रजाजनाशीं, ऐश्वर्याशीं संबंधच रहाणार नाहीं, असा ईश्वरी संकेत दिसतो. याजकरितां तूं जी आजपर्यंत स्वामीभक्ति दाखविली तिचें सार्थक कर आणि मी सांगतें एवढें काम कर.

**वार्ष्णेय.** बाईसाहेब! ईश्वरीसंकेतापुढें कोणाचा काय इलाज आहे? असो. आतां अधिक बोलून आपल्या अंतःकरणास दुःख देत नाहीं. जी आज्ञा करणें



असेल ती लवकर करावी; हा दास सेवेंत हजर आहे.

**दमयंती.** बावारे! द्यूताला आरंभ झाल्या पासून दर खेपेस पुष्कराचा जय होतो, आणि तोंतों महाराजांची वीरश्री वाढत जाते. पुष्कराचे फांसे जसे नेमके पडले आहेत, या मुळें बहुत करून संपत्ति तर गेलीच व राहिलेलीही एकदोन दिवसांत नाहींशी होणार. बरें इतक्या वरच सरेल याचाही काय नेम सांगूं? तो तर प्रत्यक्ष भाऊबंद आहे त्याच्या हातीं राज्य आल्यावर काय करील ते परमेश्वरास ठाउक. इष्टमित्र, प्रधानमंडळ, प्रजाजन, यांनीं पुष्कळ प्रकारें सांगीतलें; परंतु कोणाचेंच ऐकावयाचें नाहीं हा आपला निरधारच केला आहे. आतां इतक्यांचें जेथें ऐकिलें नाहीं, तेथें माझा वेडीचा काय पाड? यास्तव आतां विलंब करून उपयोग नाहीं मी शरण आहें हीं दोन्हीं बालकें कुंडिन पुरांत नेऊन बाबाच्या स्वाधीन कर. तूं आपल्यास उत्तम अश्व व रथ घेऊन जा. मुलें पोंचतीं केल्या वर आमची काळजी करूं नको. माझ्या माहेरीं बाबा कडे राहिलास तरी तुला कमी पडणार नाहीं; अथवा तुझे इच्छेस येईल तसें कर. (तिचा कंठ दाटून येतो.)

या प्रमाणें आज्ञा होतांच वार्ष्णेयानें रथ सिद्ध करून आणला; हें पाहून दमयंतीनें मुलांस वस्त्रें भूषणें लेववून मांडीवर घेऊन म्हणते, बाळा इंद्रसेना! व ये इंद्रसेने! आतां तुह्मीं आपल्या आजोळीं जाहो बाळांनो! आज तुमची ही माता ईश्वरानें नाहींशी केली असें समजा. वार्ष्णेया! बाळांनां जपून नेहो! भगवंता! नलराजावर कां बरें अशी वेळ आणिलीस? अरे, ज्याच्या स्वप्नांत देखील अनीतीचा लेश आला नाहीं त्या महाराजांवर आज कां बरें रागावलास? (मुलें रडूं लागतात.) बाळांनो! आतां कशाला रडतां? आज सार्‍या सुखाचा कळस झाला. भगवंता! आह्मीं मोठे पापी ह्मणून या बाळांस अंतरलों. परंतु हीं नीतिमान राजाचीं

वाळें यांचें तरीं स्मरण ठेऊन यांस सुखी ठेव ही तुला शेवटची हातजोडून प्रार्थना आहे.

दमयंतीचें या प्रकारचें भाषण ऐकून इंद्रसेन ह्मणतो आई! तुला सोडून मी कधीं कोठें जाणार नाहीं; तूं जर आजोळीं येत असलीस तर मी तुझ्या बरोबर येईन; नाहींतर मी साफ जाणार नाहीं हें ऐकून दमयंती ह्मणते! मुलानों तुह्मीं जा, मी मागाहून येईन. आजोळीं तुह्मांस कोणते गोष्टीची वाण पडणार नाहीं. हें ऐकून इंद्रसेन ह्मणतो कोणत्या गोष्टीची वाण पडणार नाहीं खरी, परंतु तेथें गेल्यावर तुला पहावीशी वाटली तर तें कसें घडेल? यास्तव माझ्यानें तुह्मास सोडून साफ जाववणार नाहीं. पुत्राचें भाषण ऐकून दमयंतीस गहिंवर लोटला, तिच्यानें एक शब्द ही बोलवेना? अशा स्थितींत तिनें वार्ष्णेयास नेत्रानें खुण केली, त्यानें त्या मुलांस रथांत घालून कुंडिनपुरीस पोंचविलीं, व आपण अयोध्येस जाऊन ऋतुपर्ण राजा कडे चाकरीस राहिला.

इकडे नल राजा पुष्करा बरोबर पुष्कळ दिवस द्युत खेळत असतां शेवटीं राज्यास ही मुकला. पुष्कर राज्यावर बसल्या नंतर त्यानें नलास आपल्या राज्यांत राहूं नको ह्मणून सांगीतलें. अशा समयीं आपल्या नल दमयंतीची काय दुर्दशा झाली असेल ती येथें लिहून व्यक्त करण्यास मी असमर्थ आहें.

पुष्कर गादीवर बसला व नलास राज्यांतून हांकून देणार ही बातमी कळतांच प्रजाजन नलाकडे प्राप्त झाले- प्रधान मंडळानीं आम्हांस चाकरी नको म्हणून सांगीतलें. सारांष पुष्कराच्या राज्यांत राहण्यास आम्हीं खुषी नाहीं असें सर्वांनीं कळविलें व नला बरोबर जाण्यास सिद्ध झाले. या प्रकारें स्थिति पाहून नल मोठ्या कष्टानें म्हणतो. प्रजाजन हो! तुह्मीं आह्मां करितां असें व्यर्थ शोक कशास करितां? परमेश्वर ज्या स्थितींत



ठेवील तींत रहाणें आपलें कर्तव्य आहे असें समजून प्रत्येकानें तीस अनुकूळ झालें पाहिजे. माझ्या कर्मांचें फळ भोगण्यास मी सिद्ध असतां विनाकारण तुह्मीं आपणांस संकटांत पाडून घेण्याची इच्छा कां धरितां बरें? तुह्मीं जी आह्मांवर प्रीति करितां तिचें फळ देण्यास ईश्वरानें कांहींच साधन ठेविलें नाहीं ह्मणून फार वाईट वाटतें. प्रजाजन हो! तुह्मीं आनंदानें नगरांत जाऊन आपल्या बाल गोपाळांसह रहावें. पुष्करा बरोबर योग्य रीतीनें वर्तन करावें ह्मणजे आज पर्यंत जी तुह्मीं आम्हांवर ममता ठेविली त तिचें सार्थक झालें असें समजेन. (त्याचा नकार पाहून) आतां तुह्मांस मी शपथ घालून सांगतों कीं, तुह्मीं माझ्या बोलण्याचा अनादर करूं नये. ज्या रीतीनें तुह्मीं आज पर्यंत मज बरोबर वागलां त्या प्रमाणें पुढें वर्तणुक ठेवावी ह्मणजे तुह्मीं माझी प्रजा झाल्याचें सार्थक होईल.

प्रधान मंडळी हो! तुह्मीं आज पर्यंत जशी इमानानें चाकरी केलीत तशी पुढें करून आपणांस सुखी करून घ्यावें तशी मी इच्छा करितों. आजपर्यंत माझ्या हातून जे अन्याय झाले असतील त्यांची क्षमा करून आह्मांस वनवासामध्यें सुख व्हावें ह्मणून सर्व जण आशिर्वाद द्या. असें ह्मणून नलदमयंती उभयतां अरण्याचा मार्ग लक्षून चालतीं झालीं.

## भाग २ रा.

दशदिशा धुंद झाल्या आहेत बक, शुक, काक इत्यादि पक्षी आपापल्या जागीं स्वस्थ बसले आहेत. धेनु, अश्व इत्यादि पशु दुःखानें आरोळ्या मारीत आहेत. अबाल वृद्धांची नगरा बाहेर एकच गर्दी होऊन गेली आहे. सर्वांस "नलराज नलराज. माते दमयंती" यावांचून दुसरा शब्द सुचेना. असें पाहून दमयंती समाधान करून ह्मणते:—

**दमयंती**:— प्रजाजनहो! आतां उगीच दुःख करून उपयोग काय? झाली गोष्ट परत येत नाहीं. बाबानों! मनुष्यांस सुख दुःखें हीं सतत लागलेलींच आहेत. आज पर्यंत आम्हीं सुख भोगिलें; परंतु पुढें दुःख देण्याचेंच जर परमेश्वराच्या मनांत असलें तर आमच्या कल्पना काय उपयोगाच्या बरें? निमुटपणें भोगिलें पाहिजे. तुह्मीं जी आह्मांवर प्रीति करितां तिचा बदला करण्यास परमेश्वरानें कांहीं हातीं ठेविलें नाहीं ह्मणून वाईट वाटतें. स्त्रियांस देवाग्नी ब्राह्मणा समक्ष केलेल्या प्रतिज्ञे प्रमाणें सुख द्या. अनाथांचा सांभाळ करा. प्राणसंकटींही वाईट मार्गाची इच्छा आणूं नका. द्यूताची गोष्ट स्वप्नांतही आणूं नका. महाराजां सारिखा पराक्रमी, विचारी, चतुर, संपत्तिमान् असा राजा पृथ्वीवर एकही सांपडला नसता. परंतु एका द्यूतानें किती संकटांत पाडलें याचें सर्वकाळ स्मरण ठेवा. संसारही सर्व ईश्वरी माया आहे. यांतील कोणत्याही गोष्टीचें सुख दुःख मनांत आणून उपयोग नाहीं. रावाचा रंक किती त्वरेनें होतो याचें उदाहरण आह्मां वरून घ्या. या दुष्ट द्यूतांची इच्छा जर महाराजांस झाली नसती तर इतका परिणाम होण्याचें कारण तरी होतें का? तर सर्व आपापल्या कर्मावर आहे. ईश्वरी इच्छा ही गोष्ट स्वतंत्र आहे; परंतु जर मनुष्य निंद्य कर्मां पासून दूर राहील तर त्यास बहुत करून दुःख होण्याचा संभव कमी आहे.

प्रजाजन हो! आतां मी तुह्मां पाशीं निरोप मागतें. आमच्या हातून जे अन्याय घडले असतील ते पोटांत घाला. ज्यास तुह्मीं आपल्या पित्या प्रमाणें मानिलें असा हा तुमचा नष्ट संपत्ति राजा दीनावस्थेस पावून एक वस्त्रानें आज वनवासास निघाला आहे याला अरण्यांत परमेश्वरानें सुखी ठेवावें ह्मणून सर्वजण आशिर्वाद द्या. मातापितरांच्या आज्ञेचें अतिक्रमण करूं नका. ईश्वराचें चिंतन करून त्याजपाशीं सत्समागमाचें मागणें



मागा. आतां माझ्यानें फार बोलवत नाहीं. आतां आमची आशा करूं नका. नळदमयंती हीं तुमचीं कोणी नाहींत असें समजा. (लोकांस गहिंवर येतोसें पाहून) नकोरे बाबांनों! आतां आम्हांस दुःख देऊं. परमेश्वर कृपा होईल त्या दिवशीं पुनः भेटी होतील. (असें म्हणून चालूं लागतात. प्रजाजन नगरांत निराश होऊन परत जातात.)

एकेक वस्त्रानिशीं उभयतां स्त्रीपुरुषें त्या खडतर मार्गानें चालत असतां आपल्या बरोबर दमयंतीस दुःख होईल व तें आपल्याच्यानें पाहवणार नाहीं असा विचार करून नल तीस म्हणतो:—

**नल.** प्रिये दमयंती! माझ्या कर्माचा तर आज कळस झाला. पहा आज दोन दिवस झाले; अन्नाचा लेश नाहीं व पुढें किती दिवस मिळणार नाहीं याचा नियम सांगवत नाहीं. अरण्यांतील दुःख तुला सहन होणार नाहीं तुझे सुकुमार पाय आतांच रक्तबंबाळ झाले आहेत. उष्णतेनें मुख कसें म्लान होऊन गेलें आहे. सखे! अन्नावांचून तुझे पंचप्राण व्याकुळ जाहले असतील; परंतु मर्यादेमुळें तूं बोलत नाहींस हें सर्व मी जाणतों; परंतु काय करूं इलाज नाहीं. तुला कधीं चालण्याची संवई नसल्यामुळें या खडतर मार्गानें चालून तुझे पाय दमले असतील हें सर्व मी जाणतों. तर माझी युक्ति ऐक. हे सर्व मार्ग मोठमोठ्या नगरांत जात आहेत, त्यांत हा दक्षिणेंकडून उत्तरेकडे जाणारा मार्ग विदर्भ देशास जातो; तर तूं या मार्गानें गमन कर. तुझा पिता मोठा श्रीमान् आहे, तो तुझा सांभाळ करील. संकटापासून मुक्त झालों ह्मणजे येऊन तुला भेटेन; परंतु या वेळेस ही युक्ति मला बरी दिसते.

**दमयंती.** महाराज! आपण माझी किमपीही काळजी करूं नये. आपल्या मुखा कडे पाहिलें म्हणजे फार खेद होतो. आपले पाय चालचालून दमले असतील; यास्तव क्षणभर विश्रांतीस्तव बसावें; म्हणजे आप

ली चरण सेवा करीन.

महाराज! आपण मला माहेरीं जाण्यास सांगतां त्यास आपली इच्छा असेल तर आपण ही विदर्भ देशास चलावें. बाबा आपली योग्यता जाणत आहे, तो आपला उत्तम प्रकारचा सत्कार करील. राज्य लक्ष्मी असून सर्व राजेही त्यास अनुकूल आहेत, व त्याजपाशीं सेना ही पुष्कळ आहे, या मुळें पुष्करा बरोबर युद्ध करून आपलें राज्य ही परत घेतां येईल तर आपण खरोखरच विदर्भ देशास चलावें. अशा स्थितींत येण्यास आपणास वाईट वाटेल तर वाटेंत कोणीतरी ओळखीचें भेटेल त्याज बरोबर निरोप पाठविला असतां वस्त्रें भूषणें आदिकरून सर्व राजोपचार येतील; नंतर आपण नगरांत जाऊं.

**नल.** सुंदरी! अग आतां कोणी आप्तांचें साह्य घेऊन त्याजवर निर्वाह करूं? वेडे! माझें राज्य विदर्भराज्यापेक्षां अधिक होतें. आज पर्यंत दयालुपणानें सोडीत होतों ती गोष्ट वेगळी. पण सर्व राजांवर माझा करभाराचा अधिकार असे, त्यास त्या सर्व गोष्टी एकीकडे ठेवून आज केवळ पोटासाठीं सासुरवाडीस गेल्या वर केवढा बरें माझा लौकिक होईल? तुझा तो प्रत्यक्ष पिता आहे आणि माहेरीं जाण्यास तुला कांहीं प्रत्यवाय नाहीं.

**दमयंती.** महाराज! यावरून आपणास माझा कंटाळा आला असें वाटतें. अहो! आपण सासुरवाडीस गेल्यानें आपली अपकीर्ति होईल तर अशा संकट समयीं मी आपणास सोडून माहेरीं गेल्यास माझी सत्कीर्ति होणार आहे काय? प्रतिमा सोडून एकटी जाण्यास छाया कधीं समर्थ होते काय? जर नाहीं तर आपण मला एकटीलाच माहेरीं जायास सांगतां याचें कारण काय? माझे मुळें आपणास अधिक दुःखामध्यें पडावें लागेल अशी आपणास भीति असेल तर महाराज! मज पासून आपणास काडीभर दुःख व्हावयाचें नाहीं, हें मी प्रतिज्ञा पूर्वक सांगते



पुरुषास धर्मप सारखा दुसरा मित्र नाहीं असें असतां मी महाभिमानें आपल्या संकट काळीं आपल्यास सोडून माहेरीं राहिल्या वर नीतिमान जन काय म्हणतील बरें? आपणांस माझा कंटाळा आला असेल तर आपणांस माझा वध करण्याचा ही अधिकार आहे; परंतु माहेरीं जाण्याची मात्र पुनः आज्ञा होऊं नये, एवढी प्रार्थना आहे.

**नल.** (दुःख होत्साता कांहीं वेळ स्तब्ध राहून म्हणतो.) प्रिये दमयंती! मी या वेळेस अगदीं भ्रमिष्ट झालों आहें त्यामुळें तुझी योग्यता न समजून तुला युक्ति सांगीतली त्याची क्षमा कर. मी शपथ पूर्वक सांगतों कीं, तुझा प्राणांतीं ही त्याग करण्यास मी इच्छित नाहीं. धर्मपत्नि सारिखा दुसरा मित्र नाहीं हें सर्व मी जाणतों; तथापि तुज सारिख्या सुकुमारीला दुःख होऊं नये म्हणून तसें बोललों; येवढ्या वरून तूं भलत्या कल्पना कां करत्येस?

**दमयंती** - महाराज! असा जर आपला निश्चयच आहे तर मग विदर्भ देशाचा मार्ग दाखविण्याचा हेतु काय असावा? प्राणप्रिय! या अरण्यांतील दुःखाचें कांहीं वाटत नाहीं; परंतु आपले हे कठोर शब्द मला फार दुःख देतात; यास्तव प्रार्थना करितें कीं, पुनः असें बोलून मला दुःख देणें आपल्या दयालुत्वास योग्य नव्हे.

दमयंतीच्या या मोहक भाषणा मुळें नल क्षणभर आनंद पावला. परंतु पुनः तिच्या स्थिती कडे पाहून दुःखीत झाला. अहाहा! तो प्रसंग त्या काळीं ज्याणीं समक्ष पाहिला असेल त्यांची काय दशा होईल? याचें अनुमान आपणास येथें होतच आहे. उभयतां स्त्री पुरुषांस तीन दिवस पर्यंत अन्नपाणी नव्हतें. उभयतांच्या अंगावर भरपूर वस्त्र देखील नव्हतें. मार्गांतील धूळ अंगावर बसून तिजवर घाम आल्या कारणानें त्यांचे एक उटणेंच लावल्या प्रमाणें दिसत आहे. अशा स्थितींत आपलीं नलदम

यंती नामक स्त्रीपुरुषें असतां क्षुधा शमविण्यास काय उपाय करावा हा विचार करीत असतां आकाशांत फिरणारे आणि सोन्याच्या पंखाचे असे कांहीं पक्षी त्यांच्या दृष्टीस पडले. त्यांस पहातांच नल राजानें विचार केला कीं, यांस धरिलें असतां मांसानें क्षुधा शांत होईल, व पंख विकले असतां जवळ कांहीं द्रव्य ही होईल असा विचार करून आपलें नेसावयाचें वस्त्र अर्धे सोडून त्यास धरण्याचा यत्न करूं लागला. इतक्यांत पक्ष्यांनीं त्या वस्त्रास हिसडा मारून ते वस्त्र घेऊन गेले. पक्षी आकाशमार्गे जातां ना पाहून नल त्यांकडे स्तब्ध पहात राहिला. तें पाहून ते पक्षी मोठ्या गंभीर पणानें ह्मणतात. विचारशून्या नला! अद्यापि आह्मांस तूं ओळखिलें नाहींस काय? अरे! तुला सर्व सुखा पासून भ्रष्ट करून अरण्यांत अन्न अन्न करीत फिरविणारे कपटपाश (फांसे) ते आह्मीं. तुझी खोड मोडण्या करितां आम्हीं पक्षांचीं रूपें घेतलीं. अद्यापि तुला सांगून ठेवितों कीं, आम्हीं तुझी पाठ पुरविणार ह्मणून सावध रहा, असें ह्मणून चालते जहाले. नल वस्त्र गेल्या मुळें खिन्न होत्साता अधोवदन करून बसला आहे असें पाहून दमयंतीची जी स्थिति झाली ती अवर्णनीय आहे. तिनें मोठ्या आर्जवानें राजास उठविलें व आपल्या आंगा वरील वस्त्राचा भाग त्यास नेसावयास दिला. या प्रमाणें हें दंपत्य एक वस्त्रानें फिरूं लागलें. क्षुधेनें फारच जुलुम केला तेव्हां उभयतांनीं वृक्षांचीं फळें चाऊन तिला शमविली. ऐश्वर्य पाहिलें तर हें आणि भर दोन प्रहरचे कडकडीत ऊन, मग त्यास रखास काय विचारावयाचें आहे. दमयंती तर अगदींच व्याकुळ झाली. त्यामुळें विश्रांतीस्तव एके वृक्षाखालीं बसलीं असतां शीतळ छाये मुळें दोघांसही समाधान वाटलें; व दमयंतीस तर लागलीच झोंप लागली. दमयंतीस गाढनिद्रिस्त पाहून नलाच्या मनांत पुनः तिला सोडण्या विषयींच्या विचारांनीं प्रवेश केला. त्यास वाटलें कीं, ही आपणा



साठीं झालेली दुर्दशा आपण आपल्या डोळ्यांनीं पहाण्यापेक्षां हिचा त्याग करावा हेंच उत्तम. तशांत हिला गाढ निद्रा लागली आहे ही संधी बरी आहे. परंतु करावें काय? वस्त्र पडलें एक. सोडून जावें तर ही नागी होईल, आणि पुन्हां मोहांत पडावें लागेल. असा विचार करून तिच्या निर्दोष मुखाकडे अवलोकन करी. तिच्या गुणांचा विचार करून आपण असें करूं नये असा क्षणभर विचार येई. याप्रमाणें कांहीं वेळ गेल्यावर त्यानें निश्चयच केला कीं हिस सोडून जावें हेंच उत्तम. असें ह्मणून प्रारब्धास ह्मणतो धिःकार असो तुला कीं अशा समयीं मजजवळ शस्त्र देखील ठेविलें नाहींस! असा विचार करित आहे इतक्यांत आकाशमार्गे एक सुंदर चाकु नलापुढें येऊन पडला. चाकु पहातांच परम आनंद होऊन त्यानें वस्त्र कापलें. आणि अगदीं हालचाल नकरितां निघून चालता झाला.

नल वस्त्र कापून कांहींसा लांब गेल्यानंतर विचारांत पडला. त्यास कांहीं सुचेना. असें पाहून तो आपणास ह्मणतो नला जी गोष्ट त्वां केलीस ती फार अयोग्य होय. अरे धर्मपत्नि अरण्यवासी वस्त्रार्धी असून निद्रिस्त असतां तिचा त्याग केलास ही गोष्ट योग्य नाहीं. (वाईट वाटून) प्रिये दमयंती! काय तुझ्या एकेक गुणाची तारिफ करूं. स्वयंवराचे वेळीं पुष्कळ राजे व देव ही तुजला वरण्याकरितां प्राप्त झाले होते. त्याकाळीं देखील त्वां आपलें अंतःकरण काडीमात्र बदलूं दिलें नाहींस. शांत समुद्रांत बळकट नांगरलेलें गलबतही थोडें बहुत हालेल. अशी तुझी योग्य वर्तणूक असतां मी तुझा त्याग करून जात आहें तस्मात मजसारखा दुष्ट दुसरा कोण बरें आढळणार आहे? प्रिये थांब तूं जागी झाली नाहींस इतक्यांत मी परत येतों. असें ह्मणून परत दमयंतीजवळ आला. पाह-

तो तों साध्वी भर निद्रेंत आहे. असें पाहून पुन्हां विचार करून ह्मण-
तो कीं माझ्याबरोबर हिची दुर्दशा व्हावी व ती आपण डोळ्यांनीं
पहावी पेक्षां हिचा त्याग करणें उत्तम. कारण अशी स्त्री बरोबर अ-
सल्यानें न जाणों आणखीं दुःखें भोगावीं लागतील. असा विचार
करून तेथून निघाला. तो कोश दोन कोश लांब गेल्यानंतर पुन्हां
विचार करून ह्मणतो कीं मी हिचा त्याग करून जात आहें पण वि-
चारी जागी झाल्यावर मी संन्निध नाहीं असें पाहून आक्रोश करून स-
मयीं प्राणत्यागही करील. पण काय करूं. प्राणप्रिये, तुझा त्याग करूं
नये असें वाटून परत येतों परंतु तुझी स्थीति पाहून जसें मृत्तिकेचें
ढेंकूळ पाण्यांत टाकावें ह्मणजे विरघळून जातें त्याप्रमाणें ते सर्व
विचार मागें पडून त्याग करणें उत्तम असें वाटूं लागतें (विचार क-
रून) नला, ही वर्त्तणूक तुजसारख्यास योग्य नाहीं. पहा जिणें आ-
पल्या स्थीतीचा विचार न करितां, पोटच्या लेंकरांची आशा न-
धरितां, इष्ट मित्र आप्त यांचा मोह न आणितां सुखानें काननवा-
स स्विकारिला तिचा त्याग करणें अयोग्य. बरें जिचें तुजवर
अप्रतिम प्रेम कीं जीस ध्यानीं मनीं तुजवांचून अन्य वस्तु दिसत
नाहीं अशा सुकुमारेस या घोर अरण्यांत जेथें हिंसा करणारे-
प्राणी वास्तव्य करतात अशा ठिकाणीं सोडून गेल्यास तिनें कोणा
च्या आधारानें रहावें बरें? या तुझ्या वर्त्तणुकीवरून जन काय ह्मणे-
ल? बरें तिचा त्याग करूं इच्छितोस तर तिचा असा कोणता अ-
पराध झाला आहे? जर निरपराधी आहे तर मग अशी दुष्ट वा-
सना का धरितोस? वास्तव परत जा. असा विचार करून पु-
न्हां दमयंतीजवळ परत आला. पहातो तों ती अद्यापि निद्रिस्त
आहे असें पाहून पुन्हा विचार करून ह्मणतो कीं मोह जरी उत्प-



न्न होतो तथापि तिकडे दृष्टी न देतां हिचा त्याग करावा हेंच उत्तम.
कारण मजबरोबर हिला अनेक संकटें भोगावीं लागतील. व हि-
स सवई नसल्यामुळें न जाणों कांहीं विपरित परिणाम घडल्यास
जन्मभर दुःख सोसावें लागेल. बरें सोडून गेल्यावर मी संन्निध
नाहीं असें पाहून कदाचित् माहेरीं गेल्यास आपल्या बालकांसह
वर्त्तमान सुखानें राहील. संकटापासून मुक्त झाल्यावर अगोदर
जाऊन भेटेन. परंतु या प्रसंगीं ही युक्ति बरी दिसते. (प्रारब्धास
हांक मारून) धिःकार असो तुला कीं मजवर असी वेळ आण-
लीस. कीं मी, जो हजारों प्रजेचें आनंदानें पालन करित होतों तो
मी आज तीन दिवस अन्नावांचून तळमळ करित आहें. अशा
दुःखापेक्षां मृत्यूही पत्करता. पण नाहीं तो तरी येणार कोठून?
भगवंता! निरपराधी स्त्रीचा त्याग करून मी जात आहें हीचें तूं
संरक्षण कर. ही तुझ्या स्वाधीन करतों. असो. आतां विलंब क-
रून उपयोगी नाहीं. कारण नजाणों साध्वी जागी होईल. व मग
सर्व विचार मागें पडतील. असें ह्मणून मोठ्या कष्टानें ह्मणतो, प्राणस-
खे दमयंती, हा नल तुझा त्याग करून जाण्या पूर्वीं एकवार तुझें शेवट-
लें चुंबन घेत आहे. (चुंबन घेतो) सखे, हिरा समजून स्विकार
केली गारगोटी निघाली असें तुला वाटेल खरें. परंतु जें मी करित
आहें तें तुला सुखावह होईल. असें समजून करित आहें. तूं जागी
झाल्यावर मजकरितां शोक करूं नको. या मोठ्या रस्त्यानें पित्याक-
डे जाऊन आनंदानें बाळांसह वर्त्तमान रहा. आपलें आचरण पवि-
त्र ठेव. परमेश्वरानें मजला सुख द्यावें ह्मणून त्याची प्रार्थना कर.
कलीच्या फेऱ्यांतून मुक्त झालों ह्मणजे येऊन तुला भेटेन. तूं मा-
झ्या विरहें करून दुःखी होऊन बाळांस दुःख देऊं नको. आपलें भ

विष्याचें सर्व सुख त्याजवर आहे हें लक्ष्यांत ठेव. तूं चतूर आहेस तू-
ला फार सांगण्यास नको. प्रिये येतों आतां. (निघून जातो)

नल निघून गेल्यावर कांहीं वेळानें साध्वी दमयंती जागी झा-
ली. जवळ पहाते तों प्राणप्रिय नाहीं. तो कोठें आहार शोधावयास
गेला असेल असें तिला प्रथम वाटलें व त्याप्रमाणें तिनें त्याचा आस
पास शोधही केला. परंतु त्या कली प्रभावाचा सपाटा कोठून समजणा-
र? असो. कांहीं वेळानें तीची खात्री झाली कीं राजा वस्त्र कापून गेला.
तेव्हां तो आपणास खचितच भेटावयाचा नाहीं. वांचणारही। अशा प्र-
संगीं एखादा हिंमतदार पुरुष असता तरी त्याचें धैर्य स्थिर राहिलें अ-
सतें काय? नाहीं. मग दमयंतीच्या स्थीतीचें अनुमान करणें अग-
दीं सुगम आहे. पण तसें नव्हे. तिनें विचार केला कीं अरण्यांत र-
डून शोक केल्यानें कांहीं फायदा व्हावयाचा नाहीं. असें जाणून जिक-
डे वाट मिळेल तिकडें जाण्याचा तिनें निश्चय केला. परंतु उपाय काय
? चार दिवसपर्यंत अन्न न मिळाल्यामुळें तिच्यानें पाऊल टाकवेना.
ह्मणून स्वस्थ एका वृक्षाखालीं बसली. व मोठ्यानें आक्रोश करून
ह्मणते महाराज, या अरण्यांतील पशूंच्या भयंकर आरोळ्या ऐकू-
न मला अतिशय भय वाटतें. महाराज, आपण माझा कां बरें त्याग
केला. प्राणप्रिय, पृथ्वीतील सर्व राजांत आपण श्रेष्ठ, धर्मज्ञ, असून
यावेळीं धर्मपत्नीचा त्याग करण्यास आपणांस कोणत्या बरें शास्त्रा
ची आज्ञा मिळाली? अहो आपण कधीं खोटें बोलत नाहीं अशी
आपली कीर्ति आहेना? मग माझ्या स्वयंवराचे वेळीं मोठमोठ्या
ऋषी समक्ष, देव ब्राह्मणासमक्ष, व सर्व लोकांसमक्ष, जी प्रतिज्ञा
केली तिचें आज कसें बरें विस्मरण झालें? महाराज, विश्वास घाताचें
पातक त्या निषध वंशांत कोणी तरी केलें आहे का? मग एका-



कीं, वस्त्रार्धा, अरण्यवासी, निद्रिस्त, आणि पतिव्रता धर्मांत पूर्ण, अशा ध-
र्मपत्नीस टाकून गेल्यावर विश्वासघात होत नाहीं काय? पतिराज प्रत्यक्ष
शत्रूविषयीं देखील इतकें कुकृत्य आपल्या हातून घडावयाचें नाहीं असें
असतां या पापिणीकडे कसें बरें इतकें मन कठोर झालें? महाराज या
भुमंडळावर जोंपर्यंत आपण राजा या नांवानें प्रसिद्ध आहां तोंपर्यंत
प्राण्यास अपमृत्युही यावयाचा नाहीं अशी जी आपली कीर्ति तिस हें
कृत्य शोभतें काय? नैषधनाथ या आपल्या निष्ठुरतेनें लोकांमध्यें तु-
मचा उपहास होणार नाहीं काय? प्राणनाथ दिसला हो दिसला आ-
ता दुरून कशास जाता? महाराज असा माझा कोणता बरें अपराध -
झाला होता कीं त्यामुळें आपण माझा त्याग केला. होय असेल -
अपराधावांचून आपल्या सारख्याच्या हातून अशी वर्तणूक व्हाव-
याची नाहीं. राजेश्वरा मी वेडी मी चुकल्यें मी विनाकारण आपल्या-
स दोष दिला. परंतु काय करूं? माझ्या अपराधाचें मजलाच परिज्ञा
न नाहीं. प्राणनाथ अपराधाची क्षमा करून एकवार दासीस दर्शन
द्या. माझी खात्री आहे आपणही मजकरितां विलाप करित अ-
साल. आपणांस उदक देखील गोड लागावयाचें नाहीं. आपल्या -
जिवास कष्ट झाले असतील. व "दमयंती प्रिये दमयंती" ह्मणून सारें
अरण्य शोधीत असाल. आपणांस शोक करितां करितां ग्लानि आ-
ली असेल. क्षुधेनें कासावीस झाला असाल. तृषेनें कंठ कोरडा
पडला असेल. हें सर्व मी जाणतें. स्वामिराज आपणांस दुःख द्या
वें असा माझा अगदीं हेतु नाहीं. परंतु काय करूं? कोणी कडे क-
र्मानें धांव घेतली व आपला व माझा वियोग झाला. प्राणपती-
धांवा हो धांवा आतां अगदीं धीर धरवत नाहीं.

साक्या

लीला तूझी वर्णायातें
विचार माझे कोते
परीही तूझी अद्भुतकरणी
नवला कारणहोते १
हे जगदीशा दीनदयाळा
दासिसंकटिंहि पडावी
उचित तुलाहा न्यायगमेतरि
[illegible] २

इच्छा इतकी पुरवुनि दासी
प्रेमानें सांभाळी
नवदावें त्वां भोगतुझ्याजें
विधिनें लिहिलें भाळीं ३
करुणाघनहें नामतुझें जर
सत्य असें म्हणशील
तरि माझानतु दुःखानळहा
विझवाया शिणशील ४
भक्तालानू अति ममतेनें
पाकिसि गर्जेडंका
परिमज त्याचा अनुभवद्याया
किमर्थ धरिशि शंका ५

याप्रमाणें विलाप करित त्या निबिड अरण्यांतून साध्वी फिरत आहे. मार्गांत ठेंचा लागत आहेत. वरचेवर मुर्छा पावत आहे. धैर्य धरून पतीचा शोध करीत आहे. मध्येंच विलाप करीत आहे. मुखांतून "नलराज" या अक्षरांचा घोष चालला आहे. वारा भण



भण वहात आहे. श्वापदांचे भयंकर शब्द चालू आहेत. अशा प्रसंगीं दमयंतीस अतिशय क्रोध येऊन म्हणते परमेश्वरा ज्या दुष्टानें नलराजास अशा संकटांत पाडलें त्यास यापेक्षां शंभरपट अधिक दुःख प्राप्त होवो. याप्रमाणें साध्वी आक्रोश करित पति शोधार्थ फिरत असतां तिच्या त्या शब्दास ऐकून तिला एका महा अजगरानें आपल्या तोंडांत धरिलें. वाचणारहो! आतां पुढें सांगण्यास माझी लेखणी सुद्धां चालत नाहीं. भगवंता नकोरे सन्मार्गवर्ती लोकांवर असा हृदयभेदक प्रसंग आणूं.

साध्वी विलाप करित असतांनां जेव्हां तिला अजगरानें धरिलें तेव्हां तिचें इकडे तिकडे फिरणें राहिलें. तेणेंकरून ती शुद्धीवर आली. पहाते तों आपण एका प्रचंड अजगराचे सपाट्यात सांपडलें आहें असें दिसलें. अशी स्थीति पाहून आतां आपण जिवंत रहात नाहीं अशी जरी तीची खात्री झाली तथापि पतीस तिनें शब्द लाविला नाहीं. उलट पतीला आपल्या मरणानें दुःख होईल म्हणून आक्रोश करूं लागली. अहाहा! धन्यरे पतिव्रता!!! अशा स्त्रीचें नामस्मरण केल्यावर कोणतें बरें पातक शिल्लक रहाणार आहे? साध्वी दमयंती तुला मी गणपती अनन्य भावानें नमस्कार करितों. असो. कटीपर्यंत शरिर अजगराचे मुखांत असून दमयंती आक्रोश करित आहे. अशा वेळीं तो करुण स्वर एका मृगव्याधानें (फांसे पारध्यानें) ऐकिला. त्याज बरोबर त्याचें अंतःकरण कळवळून त्यानें धनुष्यास बाण लाऊन अजगरावर सोडिला. बाण लागतांच अजगराचा प्राण जाऊन दमयंती मुक्त झाली.

सृष्टीमध्यें जेवढें मनुष्य निर्माण झाले आहेत त्यांतून वेडे

वसिद्ध खेरीज करून कोणास बरें द्रव्य, रूपासिक पुष्प, व उत्तम स्त्री, पहातांच मोह उत्पन्न होणार नाहीं? त्या प्रमाणें तो फांसे पारधी दमयंतीचें लोकोत्तर रूप पहातांच कामवश झाला. आणि कोणलाही विचार नकरितां पातिव्रत्य मळविण्याचा इलाज करूं लागला. वांचणारेहो! त्या निबिड अरण्यामध्यें बिचारी अबला त्याचे कचाट्यांत सांपडल्यावर मग तिची काय बरें अवस्था होणार आहे. आतां हा आपलें पातिव्रत्य मळवितो अशी जेव्हां तिची खात्री झाली तेव्हां ती मनोमय परमेश्वराची स्तुती करून ह्मणते परमेश्वरा, सांप्रत मी एकटी अरण्यवासी स्त्री असतांना हा दुष्ट मजविषयीं पाप वासना धारण करून उभा आहे. नारायणा, मी निषधपति नलराजाची भार्या आहे. इतकें स्मरून तरी या संकटापासून मुक्त कर. देवा सर्व प्रकारें तुलाही आमचा कंटाळा आला आहे असे वाटतें. राज्य जाऊन वनवासांत जरी होतों तरी पति सन्निध असल्यामुळें मला कांहीं एक वाटलें नाहीं. परंतु कोणीकडे कर्मानें धांव घेतली व त्याचा माझा वियोग झाला. भगवंता आतां मी दिनानें काय बरें तजवीज करावी. सांप्रतचा प्रसंग मोठा भयंकर दिसतो. यावेळेस माझी लाज रक्षण करणें नारायणा तुझ्या स्वाधीन आहे. याप्रमाणें साध्वी चिंताक्रांत आहे अशा समयीं तो पारधी तिच्या सन्निध ठाकला. तेव्हां दमयंती त्याची समजूत करून ह्मणते बाबारे प्रसंगीं त्वां माझा प्राण वांचविलास यास्तव तूं केवळ माझा धर्माचा पिता आहेस. यास्तव मला कन्या जाणून परत जा. बाबारे उगीच व्यर्थ माझ्या नादीं पडून आपल्या स्त्रियेस व मुलांबाळांस कशाकरितां अंतरून घेतोस. अरे परस्त्री अभिलाष हें सर्वस्वी घाताचें कारण आहे. ह्मणून तूं



तो नाद अगदीं सोड. परस्त्री अभिलाषानें कोणीतरी सुखी झाला आहे काय? नाहीं. मग तूं ही वासना कां धरितोस? (तो ऐकत नाहीं असें पाहून) मी तुला निक्षून सांगतें कीं तुझ्या सारख्या अमंगळ वाणी उच्चारणाऱ्या कोणत्याही प्राण्याचा डाह करण्याचें सामर्थ्य परमेश्वर कृपेनें आज माझ्या डोळ्यांमध्यें आहे. यास्तव त्याची प्रचित न पहातां त्वां येथून निघून जाऊन आपलें मरणाचें भय मजवर न द्यावेंस असें मी मनापासून इच्छितें. आतां तुझी बडबड सुरू झाली ह्मणजे माझ्या सामर्थ्याचा प्रयोग तुजवर सुरू झाला असें समज. याप्रकारें जरी तिनें त्याची समजूत केली तथापि त्या कामांधास त्यापासून कांहीं एक उपरती झाली नाहीं. आतां हा आपलें पातिव्रत्य मळवितो असें जेव्हां तिनें पाहिलें तेव्हां ती परमेश्वरास हांक मारून ह्मणते ईश्वरा जर नलावांचून इतर सर्व पुरुष पिता बंधु प्रमाणें मला असले जर मी खरोखर पतिव्रता असलें तर यासमयीं या दुष्टाचा देह जळून भस्म होवो. वांचकहो! पतिव्रतेचें तेज किती प्रखर आहे तें पाहा. साध्वीच्या मुखांतून "भस्महोवो" इतकीं अक्षरें निघतांच तो दुष्ट जळून खाक झाला. समस्त भगिनीनों ही गोष्ट तुह्मांस लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे. स्त्रिया अबला खऱ्या. पण जर त्यांजपाशीं पातिव्रत्य रूपी शस्त्र आहे तर त्या काळाची देखील खोड मोडतील. पाहा दमयंतीच्या मुखांतून शाप निघाल्याबरोबर तो दुष्ट जळून भस्म पावला. एथें ईश्वराची किंवा व्याधाच्या पापाची थोरवी नाहीं. थोरवी कायती दमयंतीच्या वाणीची. असो. बिचारी पतिव्रता या संकटांतून मुक्त झाल्यानंतर हळुहळु "नलराज नलराज" असा आक्रोश करून मार्ग क्रमूं लागली.

व्याधाचा नाश करून दमयंती त्या अरण्यांत फिरत असतां मान महान दुष्ट पशु वृक्ष नद्या यांच्या ऐन गर्दींत येऊन पोहोंचली.

ज्या प्रदेशाचें नांव देखील ऐकिलें नाहीं त्या ठिकाणीं एकटी अर्धवस्त्रा खडे कांटे लागून जिचे पायांतून रक्त वहात आहे, रडून रडून आक्रोश केल्यामुळें डोळ्यांतील काजळ तोंडभर पसरलें आहे, अंगास कांटे बोंचल्यामुळें त्यांतून रक्ताच्या धारा वहात आहेत, उपवासी असून पतिदुःखानें व्यास व जातीनें सुकुमार अशी राजपत्नि मग तिच्या दुःखास दुसरी काय उपमा द्यावयाची आहे? त्या गर्द झाडींत दमयंती आली असतां एका वृक्षाखालीं बसून पतीस हाक मारून ह्मणते प्राणनाथ या तुमच्या पत्नीचे या घोर अरण्यांत प्राण जाऊं पहातात. आणि ती आरोळ्या मारीत असतां तुह्मीं उत्तर देत नाहीं. हें तुमच्या स्वभावास योग्य आहे काय? महाराज हे पाहा भयंकर पशु माझ्या आंगावर येतात. यांच्या हातून तर मला सोडवा. प्राणप्रिय सत्यभाषणाकरितांच सर्व राज्याचा त्याग करून अरण्यवास स्विकारला असें असतां मजविषयींच कसें बरें आज सत्य सोडितां? दमयंती तुजवांचून या जगतांत मला कोणतीही वस्तु अधिक प्रिय नाहीं. असें जें वारंवार आपण ह्मणत होतां तें आज खोटें ठरलें काय? किंवा या संकटापासून मला मुक्त करण्याचें आपल्या आंगीं सामर्थ्य राहिलें नाहीं? पतिराज आपणास मजपासून काडीभर दुःख व्हावयाचें नाहीं. हें मी पुन्हां शपथ वाहून सांगतें. मला अन्नाची गरज नाहीं उदकाची गरज नाहीं. पोटच्या लेंकरांची गरज नाहीं. फार काय सांगूं. माझ्या प्राणाचीही गरज नाहीं. फक्त आपल्या चरणाचे दर्शनाची गरज आहे. तर एकवार येऊन दर्शन देऊन कृतार्थ करा. प्राणपति आपल्या सारख्या पुरुषाची भार्या या घोर अरण्यांत एकटी भीतीनें भ्यालेली अशी करुण स्वरानें हंबरडा फोडीत असतां आपण प्रत्युत्तर देत नाहीं. हें आपल्या दयालुत्वास योग्य काय? अशानें स्वर्गवासी



पितृगण काय बरें ह्मणतील? भगवंता तूं तरी आतां कृपा करून माझा प्राणप्रिय नलराजा दाखीव. (अरण्याकडे पाहून) हे अरण्यवासी वृक्षहो, तुह्मी गगनचुंबित आहां, तस्मात पाहा बरें माझा प्राणप्रिय नल कोठें दिसत आहे काय? माते धरित्री तूं सर्वांची माता आहेस. तुजसारखी दयालु कोणी नाहीं. यास्तव यासमयीं कन्येचे सर्व अपराध पोटांत घालून आपला जामात नलराजा कोठें पाहिला असलास तर दाखीव. देवा सूर्य नारायणा, [illegible] गाचा साक्षी आहेस. तुझी दृष्टी कोणी लपवूं शकत नाहीं. तर माझा पतिराज कोठें आहे तेवढा दाखवीनास? (पर्वताकडे वळून) हे पर्वतश्रेष्ठा, सर्वांनीं माझ्या विनंतीचा अव्हेर केला आहे तस्मात् तूं तरी कृपा करून माझा प्राणप्रिय कोठें पाहिला असलास तर सांग. बाबारे तूं मला यःकश्चित समजून धिःकार करसील तर माझें कुळ शिळ ऐक. मी विदर्भ देशच्या भिमक राजाची कन्या दमयंती आहे. माझा श्वशुर निषधदेशचा राजा वीरसेन त्याचा पुत्र जो महाराज नलराज ज्याची कीर्ति स्वर्गीं [illegible]वही गातात ज्याचें नांव ऐकिल्याबरोबर त्रिविध पातकें नष्ट हो[illegible]त त्या पुण्यश्लोकाची मी भार्या होय. कां आतां तरी ओळखपट[illegible]नां? (अमळ विचार करून) दमयंती आतां व्यर्थ कंठशोष क[illegible]नको. तुह्मी कोणाला दया न येण्यासारखेंच कांहींतरी पूर्वजन्मीं पातक असेल. तें भोगिल्यावांचून काय परिणाम? (शुद्धीवर येऊन) मला वेड तर लागलें नाहींना? मी प्राण देण्यास जरि सिद्ध झालें [illegible] काय वृक्ष पाषाण हे मजबरोबर भाषण करणार आहेत? न- तूं आतां दगडापेक्षांही कठीण हो. मनुष्य समुदायांत गेल्यावांचून आपल्या महाराजांचा शोध लागावयाचा नाहीं. हें तूं पूर्णपणें ल[illegible]त ठेव. असें ह्मणून पतीचें स्मरण करीत उत्तर दिशेस जाणारी

एक लहानशी वाट मळली होती तिच्या आधारानें मार्ग क्रमूं लागली.

---

वांचणारहो दमयंतीस आतां येथें सोडून आपण नलाकडे जाऊं चला. नल वस्त्र फाडून निघाल्यानंतर मार्ग क्रमीत असतां एकें डोंगरांत पोहोंचला. पहातो तों वणवा लागला असून एक नाग जळून भस्म होत आहे. इतक्यांत तो नाग हांक मारून ह्मणतो "नला धांव व या समयीं माझे प्राण वांचीव. मी नारद मुनींच्या शापें करून जळत आहे. माझे प्राण वांचविल्यास मी तुझा मित्र होऊन तुझ्या उपयोगीं पडेन." याप्रमाणें त्या कर्कोट नागाचें भाषण ऐकून नल त्यास ह्मणतो बाबारे मुनींच्या शापें करून जळत आहेस. तस्मात् माझ्यानें तुला काढवत नाहीं. नलाचें भाषण ऐकून नाग त्यास ह्मणतो ज्याकाळीं मला शाप मिळाला त्या वेळीं मी प्रार्थना केली तेव्हां मुनी प्रसन्न होऊन ह्मणाले कीं नल राजा तुला या संकटापासून मुक्त करील. तस्मात त्याची आज्ञा प्रमाण मानून मला या संकटापासून सोडीव. याप्रमाणें नागाचें दीनवाणी भाषण श्रवण करून नलास दया आली व त्यानें त्यास जिवंत बाहेर काढलें. नंतर नाग त्यास ह्मणतो राजा आतां त्वां येथून आयोध्येस जाऊन ऋतुपर्ण राजाकडे 'बाहुक' या नांवानें चाकरीस रहावेंस. तेथें तुला कोणी ओळखूं देऊं नये ह्मणून मी तुला दंश करून कुरुप करितों असें ह्मणून त्यास दंश केला. दंश होतांच नलराजा काळा व कुरुप झाला. तथापि त्यास विषाची बाधा झाली नाहीं. दंश केल्यानंतर नागानें त्यास दोन वस्त्रें देऊन ह्मटलें कीं ज्यावेळेस तुला पूर्व रुपाची गरज लागेल त्यासमयीं त्वां माझें नाम स्मरण करून हीं वस्त्रें परिधान करावींस ह्मणजे पूर्व रुपातें पावशील. याप्रमाणें उभयतांचा संवाद झाल्यानंतर नल तेथून निघाला तो अयोध्येस ऋतुपर्ण राजाचे दरबारांत प्राप्त झाला. ऋतुपर्ण राजा मोठा धा-



र्मिक होता. त्याचे दरबारांत कोणास मनाई नसे. ज्याला पाहिजे त्यानें जावें व आपलें दारिद्र्य निवेदन करावें. याप्रकारें जरी वहिवाट होती तरी नलाचें असें कुरुप पाहून त्यास कोणी आंत जाऊं देईना. शेवटीं ही गोष्ट राजाचे कानावर जाऊन त्यानें त्यास आंत येण्याविषयीं हुकुम केला. आज्ञा होतांच नल दरबारांत गेला. व समर्याद राजाला वंदन करून उभा राहिला. तेव्हां राजा ऋतुपर्ण त्यास विचारतो.

**ऋतुपर्ण** — बाबारे तूं कोठील रहाणारा माझे दरबारीं काय हेतु धरून प्राप्त झालास तुझ्यामध्यें गुण काय आहे हें सर्व कथन करावें.

**नल** — मी दूर देशचा रहाणारा मला "बाहुक" असें ह्मणतात. सांप्रतकाळीं रोजगार मिळावा या हेतूनें दरबारांत प्राप्त झालों आहें. मी अश्व विद्येंत निपूण आहें.

**ऋतुपर्ण** — फार उत्तम आहे. तुला अश्वाध्यक्षाचे जाग्यावर नेमितों. त्वां आनंदानें माझ्या दरबारीं राहून कालक्षेप करावा. बरें पण तूं पगार काय घेशील?

**नल** — महाराज आपल्या इच्छेस येऊन कांहीं दिल्यास घेईन. नाहीं पेक्षां मला पगाराची जरुर नाहीं.

नलाचें या प्रकारचें भाषण ऐकून ऋतुपर्णास वाटलें कीं हा कोणी थोर मनुष्य असावा. प्रसंगानुसार अशा स्थीतींत प्राप्त झाला आहे. असें जाणून त्याची उत्तम प्रकारची शुश्रूषा ठेवण्याविषयीं हुकुम दिला. ऋतुपर्णाचे घरीं नलास कांहीं कमती नव्हतें. त्यास मिष्टान्न भोजन मिळत असे. अश्वाध्यक्ष असल्यामुळें हाताखालीं पुष्कळ चाकर होते. असें असतांना नल दमयंती करितां अगदीं झुरणीस लागला. तो वारंवार खिन्न होऊन ह्मणे प्रिये दमयंती मी येथें मिष्टान्न भोजन करून रहात आहें. पण कोण जाणें सरवे तुला

शिळीभाकर पोटभर मिळत आहे कीं नाहीं! प्रिये तुला वाटत असेल कीं मी मोठ्या आनंदानें इकडे राहिलों असेन. परंतु नाहीं. प्राणावांचून शरीर, बालकावांचून गृह जसें शून्य त्याप्रमाणें तुजवांचून मला हीं सर्व सुखें विषतुल्य वाटत आहेत. फक्त प्राण रहावा म्हणून अल्पाहार करून ध्यानीं मनीं तुझी मूर्ति धरून आहें. तो मी सुदीन समजेन कीं ज्या दिवशीं उभयतांच्या भेटी होतील. पण केव्हां प्रारब्धाचा उदय होऊन तो सोन्याचा दिवस प्राप्त होईल कोण जाणे. प्रिये असशील तेथें सुखी रहा. तूं परम पवित्र आहेस. त्यामुळें तुला कांहीं मात्र दुःख देण्यास कोणी समर्थ नाहीं. मजकरितां शोक करून झुरणीस लागूं नको. ईश्वरावर भरवसा ठेव. तो तुझें कल्याण करील. असें म्हणून नल कालक्रमूं लागला. वाचणारहो! दोन पात्रांतून एकास इकडे सुस्थळीं ठेऊन बिचाऱ्या दमयंतीकडे जाऊं चला.

त्या उत्तर दिशेच्या मार्गानें बिचारी पतिव्रता एकसारखीतीन दिवस फिरत असतांना अखेरीस एक सुंदर आश्रम तिच्या दृष्टीस पडला. सर्वांस अनुभव आहेच कीं फार दिवस प्रवासांत असतांना जर एकादा साधारण ओळखीचा मनुष्य भेटला तर तो बंधुप्रमाणें वाटूं लागतो. मग या बिचारीला मनुष्य दर्शन तर दूरच. पण प्राण वांचण्याची देखील आशा नव्हती. अशा प्रसंगीं सुंदर तापसी आश्रम दृष्टीस पडल्यानंतर दमयंतीस जो आनंद झाला असेल त्याचें अनुमान वाचक सहज करितील. असो कांहीं वेळ त्या शांत आश्रमाची शोभा अवलोकन केल्यानंतर आपण सर्व दुःखापासून मुक्त झालें असें समजून आश्रमाजवळ उभी राहून दर्शनाकरितां मुनीची आज्ञा मागूं लागली. तिची प्रार्थना ऐकतांच मुनीनीं तीस आंत बोलाविलें. आणि तिच्या मुखचर्येवरून ही कोणीतरी संकटानें पिडलेली कुलीन स्त्री आहे. असें अनुमान करून अतिथी सांप्रदाया प्रमाणें तिचें आगत स्वागत करून कांहीं कंद मुळें भक्षण करावयास दिलीं. दमयंतीनें प्रसाद जाणून ग्रहण करून भक्षण केली. व समाधान पावली.



**ऋषी** — स्त्रिये तूं कोण आहेस व अशा दीन अवस्थेंत कां बरें प्रवासांत राहून कालक्षेप करित्येस? तुझ्या मुखावरून तूं कोणी कुलीन स्त्री असून संकटांत आहेस असें अनुमान होतें. अथवा या अरण्यांतील वनदेवता आह्मांवर प्रसाद करण्याकरितां प्राप्त झाली असावीस.

**दमयंती** — मुनीवर्या मी पामरीनें आपल्यावर प्रसाद काय करावयाचा आहे? मी वनदेवता नव्हे. आपल्या चरणाची दासी राजकन्या आहें. दुर्दैवामुळें आह्मी उभयतां या अरण्यांत फिरत असतां स्वामी वियोग घडल्यामुळें त्यांस शोधीत आहें. मी विदर्भ देशच्या भिमक राजाची कन्या असून माझें नांव दमयंती आहे. माझा स्वशुर निषध देशचा वीरसेन राजा त्याचा आत्मज जो महाराज नल ते मम प्राणनाथ होय. महाराज त्या मम प्राणनाथांवर द्युत क्रिडेनें अरण्य वासाचा प्रसंग आणिला. आह्मीं उभयतां या घोर अरण्यांत फिरत असतांनां दुर्दैवामुळें आमची चुकामूक पडली. आज तीन दिवस महाराजांच्या शोधार्थ सर्व अरण्य धुंडित आहें. आपला हा पवित्र आश्रम पाहून येथें महाराज असतील अशी कल्पना करून प्राप्त झालें. परंतु येथेंही ते मला दृष्टीस पडत नाहींत. तपोधनहो मी सत्य सांगतें कीं आतां जर माझे पतिराज मला लौकर भेटणार नाहींत तर माझा प्राण निश्चयें रहाणार नाहीं. आपण अंतरसाक्षी आहां. यास्तव कृपा करून माझ्या

प्राणेश्वराचा शोध सांगाल तर या धर्मकन्येस जिवदान दिल्यासारखें होईल. मुनीराज उदका वांचून जसा मीन तळमळ करितो त्याप्रमाणें माझ्या प्राणपती वांचून मी तळमळ करीत आहें. यास्तव उभयतांच्या भेटी लौकर होतील अशी तजवीज सांगा. मी दीन तुह्मांस शरण आल्यें आहें. महाराज पती वांचून हें जग मला शून्यवत भासत आहें. (दुःखी होऊन) परमेश्वर जर पंख देता तर उडून जाऊन महाराजांचा शोध केला असता. पण तसें ही नाहीं. आतां मी काय करूं (रडूं लागते)

**ऋषी** — (प्रसन्न होऊन) दमयंती आतां पुरें तुझीं सर्व दुःखें लयास गेलीं असें समज. आतां थोडक्याच काळानें तूं पतीसह वर्त्तमान राज्य सुखाचा अनुभव घेशील. तुझा पती सुखरुप आहे ... किमपि काळजी करूं नको. (असें ह्मणून अंतर्धान पावतात आ॰ न बाग इत्यादि एकदम नाहींशी होतात.)

याप्रकारें चमत्कार पाहून दमयंती कांहीं वेळ वेड्या सारखी अगदीं स्तब्ध राहिली. शेवटीं प्रारब्धावर भरवसा ठेऊन पुढें प्राप्त होणाऱ्या सुखाची आशा धरून पुढें मार्ग क्रमूं लागली. कांहीं लांब गेल्यावर मार्गांत एक लमाणांचा तांडा तिच्या दृष्टीस पडला. त्यास पहातांच जवळच मनुष्यांची वस्ती असेल व यांजबरोबर गेल्यास एकाद्या नगरांत जाऊं व कदाचित् महाराजांचा शोध तेथें लागेल. असें वाटून तीस क्षणभर आनंद झाला. लमाणांचा तांडा अगदीं जवळ आला असतांही तिच्यानें त्यांजबरोबर भाषण करवेना परंतु मग विचार केला कीं हे आले कोठून व जाणार कोठें याचा तपास केल्याशिवाय यांजबरोबर जावें हें नीट नव्हे. मग तपासाअंतीं त्या लमाणांच्या नाइकाची व इची भेट झाली. हि-



ची याप्रमाणें स्थीति पाहून त्याचें मन कळवळून ह्मणतो.

**नाईक** — बाई तूं कोण आहेस कोठें जात्येस व तुझी अशी अवस्था होण्याचें कारण काय हें सर्व कृपा करून सांग. किंवा तूं या अरण्याची देवता अथवा राक्षसी आहेस तें सांगावेंस. मनुष्य जर अससील तर तूं महन् संकटांत आहेस असें दिसतें. तर तें संकटही कथन कर. आह्मां कडून परीहार होण्याजोगें असल्यास आह्मीं किमपिही आळस करणार नाहीं.

**दमयंती** — बापहो, तुह्मीं मजविषयीं किमपिहि भीति बाळगूं नका. मी या अरण्यांतील वनदेवता किंवा राक्षसी नव्हे. तर दुःखानें व्याप्त झालेली मानुषी आहें. माझा पिता विदर्भ देशचा भीमक राजा होय मी निषध देशाधिपति जो परम पवित्र नल राजा त्याची धर्मपत्नि होय. उभयतां काननवास करित असतां दैवयोगानें माझी व त्यांची चुकामूक पडली. आपण अरण्यवास करित आहां तर कृपाकरून सांगा बरें माझा प्राणेश्वर तुह्मास कोठें भेटला काय ?

**नाईक** — बाई आह्मीं लमाण आहों. या घोर अरण्यांत हिंसा करणारे पशूच आह्मास भेटतात. तुजवांचून आह्मी मनुष्य पाहिलें नाहीं. तुझी अशी अवस्था पाहून आह्मांस वाईट वाटतें. पण कर्त्तव्य काय ? तुझे चिंतेचें निवारण आह्मांपासून होणें नाहीं. परमेश्वर तुजवर प्रसाद करून तुला दुःख मुक्त करो येवढीच आमची प्रार्थना आहे. पण बाई कृपा करून खरेंच सांग कीं तूं राजपत्नि व राजकन्या असतांना वनवास कशाकरितां प्राप्त झाला ?

**दमयंती** — बाबारे प्रारब्धापुढें इलाज चालत नाहीं. आमच्या महाराजांवर दुष्ट कलीनें भयंकर प्रसंग आणून अखेरीस अरण्याची वाट दाखविली महाराज नीतीमान पडले ह्मणून त्यांनीं आनंदानें ती-

चा स्विकार केला. अनीतीचा वास जर त्यांजमध्यें असता तर इतका—प्रसंग येतांचना. परंतु नाहीं. रवी आपली दिशा बदलील, समुद्र मर्यादा उल्लंघन करील, परंतु नलराजाचे हातून अनीति घडणार नाहीं. असा त्यांचा नेम होता. उभयतां काननवास करित असतांनां मध्यें कर्मानें वैर साधून उभयतांची ताडातोड केली. बापहो आतां कृपा करून एवढें तरी सांगा कीं हा तुमचा समाज कोणीकडे जात आहे?

**नाईक** — बाई आमचा समाज चेंदी नगरांत जात आहे. नानाप्रकारचे पदार्थ घेऊन व्यापारा करितां आह्मीं निघालों आहों.

**दमयंती** — बाबांनो तुह्मीं आपल्या समागमें मला चेंदी नगरांत न्याल काय? परमेश्वर तुमचें कल्याण करील.

दमयंतीचें याप्रकारचें भाषण ऐकून नाईकास तीची दया—आली. त्याच्या मनांत तीस बरोबर नेण्याचें होतें. परंतु बरोबर—च्या मंडळीचा या गोष्टीस नकार पडला. शेवटीं नाईकानें त्यांची समजूत करून तीस बरोबर नेण्याचें ठरलें. तेव्हां दमयंती त्यांजबरोबर मार्ग क्रमूं लागली. कांहीं दिवसांनीं त्यांस पशु अहारांनीं पूर्ण असें एक अरण्य लागलें. तें पाहून समाज मोठ्या आनंदानें तेथें तळ देऊन राहिला. एके दिवशीं मध्यरात्रीच्या सुमारास पुष्कळ वन गजांचा मेळा उदकप्राशनाकरितां नदीवर प्राप्त झाला. लमाणांत असलेल्या हत्तीस त्यांची चाऊल कळतांच ते गर्जना करूं लागले. ती ऐकतांच वनगज चवताळून लमाणांत शिरले. वजिकडे तिकडे एकच गर्दी झाली. कित्येक लमाण त्यांच्या पायांखालीं चुरून मेले. कित्येक जखमी झाले. अधींच पशु त्यांत वन पशु मग त्यांच्या पिडेस काय पहावयाचें आहे! याप्रमाणें स्थीति झाल्यावर तेथें मनुष्याची मति काय करील हें उघडच आहे.



काय त्या प्रसंगाचें वर्णन सांगूं. जीवरक्षणावांचून कोणास कांहीं सुचेना. त्यांत तो रात्रीचा प्रसंग. वाचक मला गप्पा मारतो असें ह्मणतील. पण मी खरोखरच सांगतों कीं त्याकाळीं एकाद्यास सांगितलें असतें कीं पळूं नको. स्वस्थ रहा. तुला पृथ्वीचें राज्य देतों, अगर रत्नाची मोठी रास देतों, तर त्याच्या मोहास गुंतून कोणी कबूल करता ना. असो. गजांच्या गडबडीनें पुष्कळ लमाणांचा नाश झाला. त्यानंतर कांहीं वेळानें ते वनपशु अरण्यांत निघून गेले. व राहिलेला लमाणांचा तांडा आपापल्या गण गोत्रांच्या मरणानें शोक करीत आहे, असें दमयंतीनें पाहिल्यावर मग तिच्या दुःखास काय पहावयाचें आहे.? लमाण लोक आपसांत विलाप करितात कीं हें कोणत्या कर्माचें फळ आह्मांस मिळालें कोण जाणें. स्वामी मणीभद्राची पूजा चुकलों काय? अथवा ही अमंगळ स्त्री (दमयंती) आपल्याबरोबर आहे हिचेंच हें कृत्य असावें. याप्रकारें कल्पना करून शेवटीं ही कोणी तरी राक्षसी असून मनुष्य रुपानें आमचा संव्हार करण्याकरितां आली आहे अशी खात्री करून त्या सर्वांनीं त्या अनाथ साध्वीवर अप शब्दांचा वर्षाव केला. व कित्येक विचार शून्य लमाणांनीं तर तीस ताडणही केलें. त्यावेळीं दमयंतीची जी अवस्था झाली असेल, तिचें अनुमान वाचकहो! तुह्मींच करा. तिनें मनोमय परमेश्वराची प्रार्थना केल्यानंतर आपण निरपराधी आहों अशी त्यांची खात्री करूं लागली. परंतु तीचें बोलणें ऐकतो कोण. उलटे ते अधिक रागाऊन ताडण करूं लागले. असो. अशा दुःखांत दमयंती सायंकाळच्या सुमारास—चेंदी राजाच्या नगरांत पोहोंचली. त्या चेंदी नगराची शांत शोभा अवलोकन करून तिस जो आनंद झाला, तो लिहून व्यक्त

करण्यास माझी लेखणी समर्थ नाहीं. कांहीं वेळानें दमयंती राजवाड्याजवळ प्राप्त झाली. राजपत्नि कन्येसह महालाच्या गच्चीवर हवा घेत बसली असतां दमयंतीस मुलें "वेडी वेडी खुळी खुळी" ह्मणून त्रास देत आहेत असें तिच्या पहाण्यांत आलें. हें पहातांच तिस दया आली व लागलीच दासीकडून तिला वर आणविली. दमयंतीस पहातांच राजकन्या सुनंदा मातोश्रीस ह्मणते आई साहेब माझ्या सर्व दासींपेक्षां ही मला अधिक आवडते. परमेश्वर जाणे हिला पहातांच माझें प्रेम हिच्याठायीं कां वृद्धिंगत होत आहे. यास्तव हिस माझी दासी करून ठेवा. हिच्या वांचून मला क्षणभर सुद्धां चैन पडणार नाहीं. कन्येचें भाषण ऐकून तिनें दमयंतीस आपला वृत्तांत सांगण्याचा आग्रह केला तेव्हां दमयंती मोठ्या नम्रतेनें सांगते.

**दमयंती** — दुर्दैवामुळें उभयतां प्रवास करीत असतां कांहीं दिवसांनीं पतीची व माझी चुकामूक पडली. पुढें शोध करीत करीत सर्व अरण्य शोधलें पण ठिकाण लागला नाहीं. नंतर संगतीच्या योगें या आपल्या नगरांत प्राप्त झालें. बाई साहेब मी कुलीन पण दुःखानें व्याप्त अनाथ आहें हें लक्ष्यांत ठेऊन माझा सांभाळ करणें आपणांकडे आहे.

**राजपत्नि** — तूं कांहीं काळजी करूं नको. माझे कन्येजवळ दास्यत्व करून रहा. तुला कांहीं कमी पडूं देणार नाहीं.

**सुनंदा** — आई साहेब मला वाटतें कीं हिच्या कांहीं दुर्गुणामुळें हिचा त्याग केला असावा. नाहींतर कसाही पुरुष असला तरी आपल्या स्त्रीस भरअरण्यांत सोडून देईल असें मला वाटत नाहीं. लोकांत कांहीं तरी सांगितलें पाहिजे ह्मणून ती असें सांगते.

**दमयंती** — बाई साहेब असें भाषण करून माझ्या दुःखित अंतःकरणास अधिक दुःख देऊं नका आपण ह्मणतां तशी गोष्ट नाहीं. खरोखरच त्यांची व माझी चुकामूक पडली आहे.



**राजपत्नि** — (कन्येस) बरें त्याविषयीं विशेष चौकशी करण्याची आपणांस जरूर नाहीं. कदाचित् तूं ह्मणतेस तसें जरी असलें तः पि कोणी आपल्यामुखानें आपली अपकीर्ति सांगेल काय? अथवा ती ह्मणते तीच गोष्ट सत्य नसेल कशावरून? (दमयंतीस) तूं कांहीं एक शंका मनांत न आणितां कन्येचें दास्यत्व करून रहावेंस.

**दमयंती** — (आनंद पाऊन) बाई साहेब माझ्या या स्थीतींत आपण मला आश्रय दिला त्यास परमेश्वर आपलें कल्याण करो. मी दास्यत्व करून आनंदानें राहीन. परंतु माझी एक विनंती आहे तिकडे लक्ष्य द्यावें. मी पतीवांचून इतरांचें उच्छिष्ट भक्षण करीत नाहीं. चरणसेवा करीत नाहीं. व पतीची बातमी सांगणाऱ्या पुरुषाशिवाय इतर पुरुषाबरोबर भाषण करीत नाहीं. याप्रमाणें माझा नेम आहे. त्यास प्रार्थना इतकीच कीं त्यास व्यत्यय येऊं नये.

**राजपत्नि** — तुझ्या नेमांत व्यत्यय पडेल असें आचरण मजपासून कदापि घडणार नाहीं. काळजी करूं नको.

याप्रमाणें भाषण होऊन सुनंदेची सखी ह्मणून तेथें राहिली. समस्त भगिनींनो स्त्रियांचा मुख्य धर्म जें पातिव्रत्य त्याच्या सेवनानें संकटें कशीं लयास जातात याचा ठसा तुमच्या अंतःकरणावर उठण्यास दमयंतीची कथा ही असावें तितकें पूर्ण साधन आहे, असें मला वाटतें. व ह्मणून पुढील कथेस प्रारंभ करितों.

## भाग ३रा.

नलराजा द्यूत खेळत असतां दमयंतीनें आपलीं दोन्हीं मुलें वार्ष्णेयाबरोबर माहेरीं पाठविलीं ती गोष्ट लक्ष्यांत आणा. तीं तेथें पोंहचतात इतक्यांत नलदमयंती राज्य हरून अरण्यांत गेल्याचें दुःखकारक वर्त्तमान कुंडीन पुरीस येऊन पोंहचलें. तें वर्त्तमान व तीं दोन्हीं दीनासारखीं बाळें पाहिल्या

बरोबर दमयंतीच्या वृद्ध मातापितरांची जो स्थीति झाली ती अवर्णनीय होय.
अहाहा बाळे दमयंती, ह्मणून उभयतांनीं धाडकन धरणीवर आंग टाकलें. दम-
यंती सर्वांस प्रिय असल्यामुळें हें वर्तमान ऐकतांच राजवाड्यांत एकदम मोठा
कल्होळ होऊन गेला. आतां वाचक मजवर अतिशयोक्तीचा दोष देतील प-
ण काय करूं, सांगितल्यावांचून रहावयत नाहीं. दमयंतीवर असा प्रसंग ये-
ऊन ती अरण्यांत गेली ही गोष्ट ऐकून मनुष्यांसच दुःख झालें यांत कांहीं
नवल नाहीं, पशुपक्ष्यांना दुःख झालें. कारण दमयंती त्यांजवर फार प्री-
ति करीत असे. याप्रमाणें त्या दिवशीं कुंडीनपुरींत कोणत्याही रस्त्याला
पाहिलें तरी शोकावांचून दुसरा व्यापार दिसत नव्हता. भीमक आणि त्या-
ची पत्नि या उभयतांनीं त्या मुलांकडे पहावें आणि एकदम मुर्च्छित पडावें.
याप्रमाणें स्थीति पाहून प्रधानादिकांस मोठें भय पडलें, कीं वृद्धापकाळीं रा-
जाची शोकानें काय दशा होईल कोण जाणें. त्यांनीं वारंवार राजाचें शांतवन
करावें. परंतु त्यापासून कांहींच फायदा होऊंनये. वांचणारे हो! खरेंच सां-
गा कीं समुद्राच्या पूर्ण ओघास अडविण्यास वाळूचा बांध किती उपयोगी -
आहे? त्याप्रमाणें भीमक राजाचे दुःखाचें समाधान करण्यास त्यांचा उपदेश
किती कामीं पडणार आहे! सर्वांनीं आपणांकडून परोपरीनें राजास समजा-
विलें तथापि कांहीं नाहीं. उलटा भीमक राजा मोठ्यानें हंबरडा फोडून ह्मण-
तो बाळे दमयंती, अरण्यांत गमन केलेंस त्याकाळीं तुला आह्मां वृद्धांची -
कांहींच कीं गे आठवण राहिली नाहीं. बेटा, अरण्यवास पत्करिलास त्यापे-
क्षां उभयतां इकडेच कां आलां नाहीं. किंवा हा देश पापी वाटला. किंवा तु-
ला आमचा कंटाळा आला ह्मणून तूं आली नससील. पण नाहीं. तुझ्या
सारखीच्या हातून असें घडणार नाहीं. बेटा, तुझ्या विरहानें सर्व कुंडीन
पुरी दुःख सागरांत बुडत आहे. त्यास एकवार येऊन दर्शन देऊन सर्वां-
स सुखी कर. कन्ये तुझ्या गुणांची तारीफ तरी कोठपर्यंत करूं! विवाह-



काळीं मर्यादा तर रहावी, आमच्या मनाला दुःखतर होऊं नये, अ..गे ए-
कवार ज्यास प्राण अर्पण केले अशा नलाची तर प्राप्ति व्हावी ह्मणून
स्वयंवराची कसी सुंदर तोड काढिली तशी युक्ति आतां सुचली नाहीं.
किंवा आह्मां वृद्धांचा तुला कंटाळाच आला? पण नाहीं. तुजसारख्या नी-
तीमान् कन्येच्या मनांत वृद्ध मातापितरांस दुःख द्यावें अशी गोष्ट कदा-
पि येणार नाहीं. याप्रकारें पुष्कळ विलाप करून मुर्च्छित झाला. प्रधा-
नादिकांनीं पुष्कळ शितोपचार करून पुरोहितास बोलाविलें. त्यानें
पुष्कळ प्रकारें राजाचें शांतवन केलें. नंतर कांहीं वेळानें शुद्धीवर आ-
ल्यावर सर्वानुमतें नलदमयंतीच्या शोधास देशोदेशीं ब्राह्मण पाठवावे
असें ठरलें. नंतर राजानें सहस्त्रावधी ब्राह्मण देशोदेशीं रवाना केले.
त्यापैकीं सुदेव नांवाचा ब्राह्मण चेदी नगरांत जेथें दमयंती राहिली-
होती, तेथें येऊन पोंहचला. व नगरांत दमयंतीचा शोध करूं लागला.
एके दिवशीं दमयंतीनें सुनंदेचे अंगास उटणें लाऊन स्नानाची
तयारी करून दिली असतां सुनंदेनें आपला रत्नांचा हार दमयंतीजव-
ळ ठेवावयास दिला. दमयंतीनें तो हार बाहेरच्या खोलींत एका खुं-
टिला अडकावून ठेविला. व आपण पतिचिंतेंत शोकातुर बसली.
ती वारंवार विचार करून ह्मणे कीं अशा दाश्यत्वांत कितीही वर्षे का-
ढिली तरी पतीचा शोध कळणें कठीण. ती वारंवार नलास हांक मारून
ह्मणे प्राणनाथ आपण कोठें असाल,? आपली काय अवस्था झाली
असेल.? महाराज आपल्या सारख्या वीराच्या भार्येनें अज्ञातवासां-
त दाश्यत्व करून दिवस काढावे हें आपल्या कीर्तिस शोभतें काय? प-
तिराज, आशेनें आजपर्यंत दिवस काढिले. परंतु आतां बरीगत दि-
सत नाहीं. आतां फारयानें आपला विरह फार दिवस सहन करवणा-
र नाहीं. यास्तव कृपा करून एकवार भेटून दासीचे नेत्र कृतार्थ क-

रा राजेश्वरा आतां मनविषयीं कठोर अंतःकरण न करितां त्वरित द-
र्शन द्या. प्रभो आतां तूं तरी अंत न पहातां माझी व पतीची भेट करीव.
हायरे कर्मा धिःकार असो तुला. जी मी कीं माझ्या तोंडांतून शब्द निघा-
ल्या बरोबर तो झेलण्यास शेंकडों दासी "आज्ञा बाई साहेब" ह्मणून तया-
र असत ती मी आज दुसऱ्याचें दास्यत्व करीत आहे. नारायणा, आ-
तां तुला इतकीच प्रार्थना आहे कीं प्राणनाथाचे नजरेस हें कलेवर पडे-
ल असें कर. याप्रमाणें साध्वी शोकांत आहे अशी संधी पाहून कलीनें
तो खुंटीवरील हार नाहींसा केला. राजकन्या सुनंदा स्नान करून बा-
हेर आली. तेव्हां दमयंतीनें सर्व प्रकारें तिची तरतूद केली. तेव्हां सुनं-
दा तीस ह्मणते दासी आतां हार आण कोठें आहे तो.

**दमयंती** — (खुंटीवर हार नाहीं असें पाहून) हायरे कर्मा, आतां काय
रे मी करूं. (रडून) बाई साहेब तुह्मीं हार मजजवळ दिलात तो मी या खुं-
टीस अडकावून ठेविला. परंतु आतां पहात्यें तों तेथें दिसत नाहीं.

**सुनंदा** — दासी विचार करून बोल. हार खुंटीस ठेविला तर
काय खुंटीनें गिळिला वाटतें. दरवाजे बंद आहेत त्यामुळें परकी मनुष्य
आंत आला नाहीं हें सिद्ध आहे. तेव्हां तुजवांचून हार गेला कोठें? नि-
मूटपणें हार दे ह्मणजे अब्रु राहिल. आजपर्यंत तुजवर माझी ममता कि-
ती होती याचा विचार कर. नाव मात्र दासी पण खरोखर मी तुला-
माझ्या मैत्रिणीप्रमाणें वागवीत होतें. उत्तम प्रतीचें मिष्टान्न भोजन
घालीत होतें. त्याचा उपकार आज असा फेडत्येस काय? विश्वास जा-
णून जवळ बाळगिली त्याचा परिणाम असा करावास काय? मी निक्षू-
ण सांगत्यें, हार लौकर दे. नाहींतर मला ही गोष्ट आई साहेबांस कळ-
वावी लागेल.

**दमयंती** — बाई साहेब मी तुह्मांस हात जोडून सांगत्यें कीं, तुम-



चा हार मजजवळ नाहीं. तुह्मीं दिलात तसाच मी तो खुंटीस अडकावीला.
आतां तेथें नाहीं, त्यास मी काय करूं. परमेश्वर जाणें, काय त्याची अव-
स्था झाली असेल ती. मी निरपराधी आहें.

**सुनंदा** — (रागावून) पुरे पुरे, आतां पांडित्य पुरे. चोर तर चोर आ-
णि दुसरी शिरजोर. हार चोरून दुसरा निरपराधीपणाचा डौल मारीत-
आहे. अशाच ढंगानें नवऱ्यानें सोडून दिली असेल. लोकांत मात्र सांग-
त्ये माझी चुकामूक पडली ह्मणून.

**दमयंती** — बाई साहेब असें टोंचून भाषण करणें आपणां सार-
ख्या थोरांस उचित नव्हे. आपण ह्मणतां तसें नाहीं. खरोखरच माझी
व त्यांची चुकामूक पडली. व ह्मणूनच मी आज या दशेस प्राप्त झालें.
असो. हार खरोखरच माझेजवळ नाहीं. या उपर आपणांस जें करणें अ-
सेल तें करावें. मी सिद्ध आहें.

**सुनंदा** — दासी, अद्याप मला तुझी दया येत आहे. विचार कर. मी-
राजकन्या आहें. आज सर्व माझ्या स्वाधीन आहे. तशांत चोरी कांहीं
सामान्य नाहीं, कीं तिजवर दुर्लक्ष्य करावें. यास्तव कृपा करून हार दे.
(दरवाजा उघडून दुसऱ्या दासीस हांक मारून) दासी धांवत जा. व आई-
साहेबांस लौकर बोलावून आण. (दासी जाते व आई साहेब प्राप्त
होतात.) हें पाहून सुनंदा ह्मणते) आई साहेब, मी आंग धुण्यास जा-
ण्या पूर्वीं माझा हार काढून दासीजवळ दिला. मी परत आल्यावर हार
मागूं लागलें, तर ह्मणत्ये मी या खुंटीवर ठेविला होता. व तेथें आतां
नाहीं. माझा हार हिनें चोरला तो लौकर देववा. हारावांचून मला-
क्षणभर सुद्धां चैन पडणार नाहीं.

**आई साहेब** — दासी, खरी गोष्ट काय? मग आतां हार देना. तु-
ह्मां उभयतांशिवाय परकी कोणी आला नाहीं. मग हार जाईल कोठें.

स्कनंदा आपला हार ठेऊन तुजवर चोरीचा आळ घालणार नाहीं.

**दमयंती —** आई साहेब, हार मजजवळ दिला ही गोष्ट खरी. परंतु आ-ला नाहीं हेंही खरें. व माझेजवळ नाहीं हेंही खरें. प्रारब्ध माझें त्यास काय इलाज. परंतु गोष्ट याप्रमाणें घडली खरी. मी निरपराधी आहें. आपणांस उक्त दिसेल तसें करावें.

**आईसाहेब —** अशानें स्फटका होणार नाहीं. जरी मी राजपत्नि आहे तरी मी तुला शिक्षा करूं इच्छित नाहीं. ही गोष्ट मी सरकारचे कानावर घालत्ये. मग जी व्यवस्थाकरणें ती तिकडून होईल. ( असें ह्मणून दासीस राजास बोलाऊं पाठवित्ये, राजा येऊन सिंहासनावर बसतो, राणी हाराचा सर्व वृत्तांत त्यास निवेदन करित्ये, तो ऐकून राजा ह्मणतो. )

**राजा —** आतां ऐकिलेली सर्व हकिगत खरी आहेनां? याजवरून चोरीचा अपराध तुजवर लागू होतो. दासी आमच्या देशच्या चाली प्रमाणें चोरास देहांत शिक्षा दिली पाहिजे. तर ती शिक्षा तुला कां करूं नये याबद्दल कांहीं बोलणें असेल तर बोल.

**दमयंती —** धर्मासनापुढें मी अपराधी ठरत आहें. परंतु मी वास्तवीक सांगतें कीं मी निरपराधी आहें. मी हार चोरला नाहीं. जगांतील सर्व संपत्ति दिली तरी असलें निंद्य कर्म माझे हातून घडणार नाहीं.

**राजा —** दासी, तुझा निरपराधीपणा शाबीद होण्यास हार प्राप्त झाला पाहिजे. जोंपर्यंत तो हार प्राप्त झाला नाहीं तोंपर्यंत तूं अपराधी आहेस हें सिद्ध आहे.

**दमयंती —** ( मोठ्या कष्टानें परमेश्वरास हांक मारून ) परमेश्वरा, कर्मानें आतां शेवट केला. आजपर्यंत दुःखांत पाडलें. व आतां तर प्राणावर येऊन बितली. असो. (मोठ्यानें) दीन दयाळा प्रभो जर मी



खरोखर पतिव्रता असेन, जर खरोखर पतीनें माझा त्याग केला नसेल, सासर व माहेर हीं दोन्हीं कुळें पवित्र असलीं तर या धर्मासनाची खात्री होण्याकरितां, स्त्रियांस पातिव्रत्याची किंमत समजण्याकरितां, सांप्रत असलेल्या स्त्रियांस अवलोकन करण्याकरितां, व पुढें होणाऱ्यास उदाहरण घेण्याकरितां ज्या दुष्टानें हार नेऊन मजवर चोरीचा आळ आणला असेल तो दुष्ट तो हार या धर्मासनापुढें आणून टाकून माझा निर्दोषपणा सिद्ध करो. अगर मी अपराधी असलें तर माझा देह जळून भस्म होवो. ( याप्रकारें दमयंतीचें भाषण ऐकतांच कली गुप्त रुपानें येऊन राजापुढें हार टाकून सती, सती, सती असें ह्मणून चालता होतो. - राजा व राणी तटस्थ होतात. )

**राजा —** दासी आतां तुझा निरपराधीपणा सिद्ध झाला. मला वाटतें कीं तूं कोणी तरी महान साध्वी स्त्री असावीस. प्रसंगानुसार तूं आह्मांजवळ राहिली आहेस. नाहींतर असा चमत्कार आजपर्यंत पहाण्यांत आला नव्हता ( राजा, राणी निघून जातात. इतक्यांत स्कदेव नांवाचा ब्राह्मण दमयंतीस अवलोकन करितो. )

दमयंतीस अवलोकन करतांच स्कदेव ह्मणतो, बाई, तुझें सौभाग्य वाढो. व तुझे कुश देशांतरास जावोत. बाई, मनांत कांहीं शंका आणूं नको. मी भीमक राजाकडील स्कदेव ब्राह्मण आहें. नलराजा राज्य हरून पत्निसह अरण्यांत गेला ही बातमी कुंडीनपुरीस पोंहचतांच सर्व नगरांत जन शोकातुर झाले. राजा, राणी हीं तर दुःखानें अगदीं मरणोन्मुख झालीं आहेत. तुह्मां उभयतांच्या शोधार्थ सहस्त्रावधी ब्राह्मण फीरत आहेत. राजवाड्यांत जिकडे तिकडे शोक दिसत आहे. दास, दासी, पशु, पक्षी सर्व तुझ्या दुःखें करून व्याकूळ आहेत. फिरत असलेल्या ब्राह्मणांपैकीं आज तुझी भेट झाली असें पाहून मी स्कदेव आपणास कृतार्थ मानून घेतों. स्कदेवा-

त्या मुखांतून हीं अक्षरें ऐकिल्याबरोबर दमयंतीस मागील सर्व स्वरूपाची —
स्मृति झाली. व त्यामुळें तीस दुःखाचा जो हुंदका आला, त्यामुळें ती मोठ्या-
गळ्यानें रडूं लागली. लागलीच तिला तें कुंडीनपूर, मातापितर, दासदासी,
मैत्रिणी, आपलीं लहान मुलें असें एकदम तिच्यापुढें उभें राहिलें. आपण
कोण आहों याची परिस्फूरता करूं नये असा जरी पूर्वीपासून तिचा नेम-
होता तरी त्याकाळीं मोहावश झाल्यामुळें तिचा कांहीं इलाज चालेना. आ-
पण कोण, कोठें आहों याची तर स्मृतीच राहिली नाहीं. आणि स्रुदेवाच्या
गळ्यास मिठी मारून विलाप करूं लागली.

**दमयंती** — स्रुदेवा, कुंडीनपूर आपण सोडलें तेथपर्यंत माझीं वृद्ध मा-
तापितरें जिवंत होतीं काय? त्यांना माझ्या या भयंकर स्थीतीनें पराकाष्टे-
चें दुःख झालें असेल. शीव, शीव मी कशाला तरी जन्मास आलें कीं माता
पितरास व प्रत्यक्ष पतीस दुःखास कारण झालें. स्रुदेवा जसें मातापित-
रांचें आपण कुशळ सांगितलें त्याचप्रमाणें प्राणनाथाचा कोठें शोध ला-
गला असला तर सांगा. त्यांच्या दर्शनावांचून इतर सर्व स्रुखें मला विष-
तुल्य आहेत. प्राणपति आपण कोठें असाल, आपली काय स्थीति झा-
ली असेल. माझें स्मरण झाल्याबरोबर आपणास काय वाटत असेल. पर्व-
त गुहेमध्यें तपश्चर्या करित असाल, किंवा कोठें कोणाची शेवा करून राहि-
ले असाल, याचा कांहींच थांग लागत नाहीं. पतिराज मी आतां काय बरें
करूं? महाराज पुरें झालें तेवढें पुरें. आतां तरी अज्ञातवास सोडून दासी-
स दर्शन द्या.

**स्रुदेव** — राजकन्ये दमयंती आतां तूं अगदीं दुःख करूं नको. सहस्त्रा-
वधी ब्राह्मण तुमच्या शोधार्थ फिरत आहेत. आपण कुंडीनपुरीस पोंहच-
तों इतक्यांत दुसरे ब्राह्मण तुझ्या पतीचा शोध लाऊन त्याला ही घेऊन
येतील. यास्तव आतां विलंब नकरितां मजबरोबर चलावें. मार्गाच्या-



सामुग्री करितां राजानें माझेजवळ द्रव्य दिलें आहे. तुला कांहीं एक काळ-
जी नाहीं.

**दमयंती** — अरेरे, मजकरितां पित्याला इतके प्रयास पडले ना? परमे-
श्वरा मी एक अपराधी होतें. पण त्या दृष्टांस कांबरें व्यर्थ छळिलेंस. ( क्र-
ष्टी होऊन ) प्रभो, तुझेजवळ दया अगदीं शिल्लक राहिली नाहीं. असें वा-
टतें. देवा, नलराजासारखा पराक्रमी, व दयालु असा एकही राजा या-
भुमंडळावर निघाला नसता. असें असतां तोच अन्न, अन्न, पाणी, पाणी
करित वनवास भोगीत आहे. त्यास असें कोणतें भयंकर पातक त्यानें
केलें होतें. विधात्या, ज्याकाळीं त्यां त्याचे भाळीं अशीं अक्षरें लिहिलीस
त्यावेळेस तुझ्या मनांत कांहींच कां रे विचार आला नाहीं.? देवा, या अशा
वर्तणुकीनें तुला अनाथनाथ या नांवानें कोण बरें हांक मारील ?( पि-
त्याच्या स्थीतीचा विचार मनांत आणून ) बाबा, माझेमुळें आपणास अ-
तिशय दुःख सोसावें लागलें असेल. व आपला वृद्धाप काळ असल्या-
मुळें आपण केवळ मरणोन्मुख पडला असाल. हें सर्व मी जाणतें. पण
काय करूं? राज्य हरण झाल्यावर पतीसहवर्तमान तुह्मांकडे यावें, असें
मनांत आलें, व त्याप्रमाणें त्यांस विनंतीही केली. परंतु त्यांचा नकार प-
डला. बाबा खरेंच सांगा. मग त्यांस सोडून मी एकटी तुह्मांकडे आलें अ-
सतें, तर तुह्मांस तें आवडतें काय? नाहीं. मग माझा तरी काय इलाज.
असो. परमेश्वर कृपेनें तेही दिवस पार पडले. आतां थोडक्याच वेळांत
आपल्या भेटी होऊन एकमेकांस डोळे भर पाहूं. ( मुलांची आठवण क-
रून ) बाळांनों, आतां मी लौकरच येऊन तुह्मांस भेटेन. काळजी क-
रूं नका. ( रडूं लागते. )

आर्या.

चाले न तर्क कुंठित, मति झाली वर्णितां तुझी लीला;

परि दिन या त्वां माझ्या, द्यावा आधार संकटीं धीला. १
पतिच्या वचनीं अंतर, पडलें नाहीं तुझ्याहि भजनांत,
छळिसी जरि अन्यायें, तरि काय जगुं तिला भवदुर्जनांत. २
दुःसह कोप सतीचा, प्रभुच्या हृदयांत बाण सा शिरतो,
होतो व्याकुळ तेणें, मग शमवाया करी पुढें शिरतो. ३
ऐसा जो प्रभु त्यायें, दासीही शरण करि पदीं नमना,
येवो नवीट ईचा, पदरीं घे ताषवींच तूं स्वमना. ४

याप्रमाणें दमयंती विलाप करीत असतांना, अकस्मात सुनंदा तेथें प्राप्त झाली. हिची अशी दशा पाहून तिला पराकाष्टेचें वाईट वाटलें. दमयंतीची व तीची उत्तम प्रकारची मैत्री असल्यामुळें, दमयंतीस दुःख झाल्यास तीही दुःखी होत असे. याप्रकारें प्रेम असल्यामुळें, सांप्रत दमयंतीस दुःखी पाहून तिस परम खेद होऊन तिनें तिस पोटासि धरिलें. व नानाप्रकारें समजावणी करूं लागली. तथापि दमयंतीचें रडें बंद होईना. आपल्या खऱ्या स्थीतीची जी आतां परिस्फुटता होईल, ह्मणून शोक आवरावा, असें कित्येक वेळां तिचे मनांत आलें परंतु उपयोग काय? प्रलय काळच्या पर्जन्यापुढें आपलीं घरें किती बरें टिकाव धरितील? मग दमयंती सारख्या संकटांनीं गांजलेल्या मनुष्याचें अंतःकरण कोठपर्यंत स्वस्थ रहाणार आहे? शुका सारखे ब्रह्मवेत्ते, वसिष्ठा सारखे शांत, इंद्रा सारखे तपस्वी, जनका सारखे विदेही असे असते तरी त्यास दमयंतीचें दुःखाचें दर्शनही दुःसह झालें असतें. मग दमयंतीवर आपण कोणत्या प्रकारें बरें दोष द्यावा? दुसऱ्यास ऐकण्यासही दुःसह अशा संकटांनीं गांजल्यामुळें, तिच्या वृत्ति कशा बरें स्थिर रहातील? विवाहसोहळा, पित्याचे घरीं आनंदानें रहाणें, दास, दासी, सख्या, भर्त्याची अत्यंत प्रीति इत्यादि सुखें व सुतापजय, अरण्यगमन, पतीचा वियो-



ग, अजगराची मिठी, लमाणांची दुरुत्तरें, चेदी नगरांत दासीचे रूपानें रहाणें इत्यादि दुःखें यांची तजबीर एकवेळींच ज्याचे हृदयावर उमटली जाईल, त्याच्या दुःखाचा अजमास वांचणारांनीं आपल्यावरूनच करावा. दमयंती तर शुद्ध वेडी झाली. सुनंदेनें तिचे डोळे पुसले. केश सांवरले. व नीट बसवून ह्मणते:—

**सुनंदा—** सखे, आज तुला इतकें रडावयाला झालें तरी काय? तुला कोणी अपशब्द बोलले, अपमान केला, किंवा काम सांगितलें झालें तरी काय? तें मला सांग. तुझीच शपथ वाहून सांगतें की त्याचें पारिपत्य केल्यावांचून अन्नास शिवणार नाहीं. उगीच नको आई रडूं. आतां तुला किती बरें सांगूं. मी आपली वेडी ह्मणून बडबड करित्यें.

याप्रकारें जरी सुनंदेनें तिची समजूत केली, तरी दमयंतीचे तोंडानें शब्द निघेना. दमयंतीचें व सुनंदेचें प्रेम पाहून सुदेवास समाधान वाटलें. व दमयंतीचें समाधान करण्याकरितां तो कांहीं बोलूं लागला. तेव्हां सुनंदेची नजर त्याजकडे गेली. सुदेवाची गहिंवरलेली मुद्रा पाहून, दमयंतीचे दुःखास हाच कारण असावा, असें तिनें अनुमान करून यास विचारिलें असतां, खरी बातमी लागेल असें विचार करून तिनें मोठ्या नम्रतेनें सुदेवास तुह्मी कोठील कोण तुमच्या दर्शनानें माझी सखी इतकी दुःखित होण्याचें कारण काय, एवढें कृपा करून सांगावें. ह्मणून प्रश्न केला. सुनंदेचा प्रश्न ऐकून सुदेवास मोठा विचार पडला. दमयंतीनें आपली खरी हकिगत सांगितली नाहीं हें जर त्यास श्रुत असतें तर तोही तसाच जबाब देऊन ही येथून खरी हकिगत न कळतां पसार झाली असती. परंतु सुदेवास दमयंती येथें राहिली कशी, हें घर कोणाचें, प्रश्न करणार कोण आहे वगैरे गोष्टींची मुळींच माहिती नसल्यामुळें, त्यानें, खरी गोष्ट सां-

गण्यास प्रारंभ करून म्हणतो:— )

**सुदेव**— आई, ही विदर्भ देशच्या भीमक राजाची कन्या, व निषध देशच्या नलराजाची पत्नि दमयंती होय. दुर्दैवानें नलराजा द्यूतांत राज्य हरून पत्नीसहवर्तमान अरण्यांत निघून गेला. ही बातमी कुंडीनपुरींत पोंहतांच जिकडे तिकडे हाहाःकार पडून गेला. दमयंतीची ही स्थीति ऐकून राजा परम कष्टी झाला. व उभयतांच्या शोधार्थ सहस्त्रावधी ब्राह्मण देशोदेशीं रवाना केले. त्यांतील मी सुदेव, दमयंतीची भेट झाली म्हणून आपणास धन्य मानून घेत आहें.

सुदेवाच्या तोंडचीं हीं अक्षरें सुनंदेचे आईनें श्रवण करतांच आपली भाची दमयंती तिच ही, अशी तिची खात्री होऊन एकाएकीं तिच्या अंतःकरणास मोहाचा धक्का बसला. ती एकदम आक्रोश करीत इतक्या त्वरेनें आली कीं, डोळ्यापुढें काय आहे ह्याचें तिला भान राहिलें नाहीं. दमयंती प्रत्यक्ष पुढें असतांनांही तिच्या नेत्रांतून धारा चालल्यामुळें कांहींएक न दिसून वेड्याप्रमाणें दमयंती, दमयंती म्हणून हाका मारित इकडून तिकडे फिरूं लागली. मातोश्रीची अशी दशा पाहून सुनंदेनें तिस आणून दमयंतीजवळ बसविलें. तिनें दमयंतीच्या आंगावरून हात फिरवून, बये, कोठें ग आहेस तूं म्हणून आरोळी मारिली. व तिला पोटासिं धरून उभयतां शोक करूं लागल्या. सुनंदाही उभयतांस शोकाक्रांत पाहून रडूं लागली. हा चमत्कार पाहून सुदेवानें दासीकडून त्यांस सांवलींत घेववीलें. व शितोपचार सुरू केले. कांहीं वेळानंतर उभयतां सावध झाल्या. चेदी मातेनें, दमयंतीस पाहिल्याबरोबर पुन्हां शोकास प्रारंभ केला. अहाहा बेटा दमयंती, आज इतके दिवस राहून मला ओळख दिली नाहींस? तुला एवढीं संकटें पडून— ईश्वरानें या स्थीतीस आणिलें काय? (कष्टी होऊन) धिःकार



असो या संततीला. संपत्ति मनुष्यास गर्व आणित्ये व नेत्रांस अंधत्व आणित्ये, हें उघड आहे. बिचारी दुःखानें गांजलेली माझ्या घरीं आली, तिला मी दुष्टेनें न ओळखितां, जिचें कन्येप्रमाणें पालन करणें योग्य होतें, तिजपासून दास्यत्व करविलें. देवा, हें वर्तमान माझ्या बहिणीला समजल्यावर ती काय बरें म्हणेल. प्रत्यक्ष भाची बरोबर या प्रकारची माझी वर्तणूक ऐकून जन मजविषयीं काय अनुमान करील! नारायणा, दमयंती इतकी पवित्र असतांना तिजवर कां बरें इतका दुःखाचा प्रसंग आणिलास? (दमयंतीस पोटासीं धरून) बये, ये, झालें त्यास इलाज नाहीं. अग, मला एक वृद्धापकाळामुळें दिसलें नाहीं. परंतु त्वां तर मला ओळख द्यावयाची होती. म्हणजे आजपर्यंत तूं कधींच माहेरीं जाऊन पतीचा शोधही लागला असता. व वृद्ध मातापितरांस दुःखही कमी झालें असतें. बेटा, धन्य तूं कीं, मातेच्या उदरीं आल्याचें सार्थक केलेंस. पतिव्रते काय तुझा महिमा! तुझें तेज प्रखर आहे, अशी माझी त्या हाराच्या वेळेपासून खात्री झाली. बेटा उठ आतां शोक पुरें कर. प्रभो, नलराजाची कीर्ति, दमयंतीचें पातिव्रत्य, नैषध वंशाचें अपार पुण्य, यांतून एकही गोष्ट तुझ्या न्याय डोळ्यांनी दिसली नाहीं का. अशानें तुला अनाथनाथ म्हणून कोण बरें हांक मारील? देवा, या माझ्या दमयंतीकडे स्पष्टपणें पहाण्यास सूर्य किरणें ही लाजत, तिच्या तोंडांतून शब्द निघाल्याबरोबर शेंकडों दासी तो वरचेवर झेलीत, मनांत आणलेली गोष्ट पार पाडल्यावांचून जी राहिलीच नाहीं, स्वभावानें जी सरळ, मनानें उदार व दयालु, बुद्धीनें पोक्त अशा सुंदरीवर असा भयंकर प्रसंग आला, तेव्हां या सर्व कृत्यांत तुजवांचून कोणास बरें शब्द लावूं? देवा, हिला इतकें दुःख दिलेंस त्यावेळीं तुला कांहींच कां रे दया आली नाहीं? परमेश्वरा, आम्हीं मनुष्यें जरी अज्ञान आ-

हों तरी तुझ्या कर्तृत्वाचें ज्ञान आम्हांस आहे. तर आतां खरेंच सांग -
कीं, माझ्या बाळेनें असा कोणता अपराध केला होता? याप्रकारें नानाप-
रीनें विलाप करीत आहेत. सर्वच दुःखानें व्याप्त असल्यामुळें कोणी-
कोणाला समजावीत नाहींत. तिकडे सुनंदा, इकडे तिची आई, व पलि
कडे दमयंती आपापल्या प्रारब्धास शब्द लावून दुःख करीत आहेत.
असें पाहून सुदेवानें विचार केला कीं आतां यांचें जर समाधान न केलें
तर न जाणों दमयंतीची प्रकृति अधिक बिघडेल. यास्तव यांचें समाधान
करून दमयंतीसह येथून लौकर चालतें व्हावें हें उत्तम. असा विचार क-
रून तो म्हणतो :—

**सुदेव** — बाईसाहेब, आपली व माझी जरी ओळख नाहीं, तथापि
आपल्या भाषणावरून आपण दमयंतीच्या कोणी तरी आप्त आहां अशी
माझी खात्री होते. आपण तिचे आप्त असतां व ती संकटांत असून --
आज कित्येक दिवस पर्यंत तुमचे घरीं असतां परस्परांची ओळख पट-
ली नाहीं. याजवरून आपणांस दुःख झालें त्यांत फारसें आश्चर्य ना-
हीं. परंतु आतां ओळख पटून उभयतांच्या भेटी झाल्यानंतर शोक -
करून तिचे जिवास अधिक त्रास देणें यांत काय अर्थ बरें? आपणां
सारख्या विचारवंत वृद्धांनीं जर असा शोक केला. तर दुःखानें गांज-
लेल्या दमयंतीनें काय बरें करावें? तर आतां शोकाचा त्याग करून
दमयंतीची मजबरोबर रवानगी करावी. तिचे वृद्ध मातापितर जपमाळ घे-
ऊन मार्ग प्रतिक्षा करीत बसले असतील.

**चेदीमाता** — बाबारे, जीचें कन्येप्रमाणें पालन करणें योग्य होतें ती-
स मी दासी केली. हें ऐकिल्याबरोबर जन मला दोष देणार नाहीं काय?
दमयंती दुःखित स्थीतींत माझे घरीं आश्रय घेण्यास आली त्या-
काळीं म्यां तिस या प्रकारें वागवीलें असें ऐकून माझी बहिण मज-



विषयीं काय अनुमान करील बरें? वस्तुतः दमयंती म्हणजे मला सुनंदेपेक्षा क-
मी, असें नाहीं. बहुत वर्षें पाहिली नव्हती, व तशांत वृद्धापकाळ, यामुळें मा-
झी ओळख पटली नाहीं. पण तिनें तर ओळख द्यावयाची होती. सुदे-
वा, आतां काय रे करूं (रडूं लागते) 

**सुदेव** — ओळख न पटल्यामुळें झाली गोष्ट ती झाली. त्याबद्दल आ-
पणास कोणी वाईट म्हणणार नाहीं. बाई साहेब, आपण शोकाचा त्याग-
करून दमयंतीच्या रवानगीची तजवीज लौकर करावी.

सुदेवाचें हें विचारी भाषण श्रवण करून चेदीमातेनें शोकाचा
त्याग करून दमयंतीस जवळ बोलावून तिला अरण्यांतील सर्व वृत्तांत
सांगण्यास आग्रह करूं लागली. जेव्हां दमयंतीच्या मुखानें अरण्यांतील
सर्व संकटें तिच्या कानीं पडलीं, तेव्हां तिला पराकाष्टेचें दुःख झालें. पर-
तु सुदेव जवळ असल्यामुळें तिच्या शोक समुद्रास भरतें येऊं न देतां त्या-
नें तिचें समाधान केलें. असो. दमयंतीचा सर्व वृत्तांत श्रवण केल्यानंतर
चेदीमातेनें, सुदेवास आपलाही वृत्तांत सांगण्यास प्रारंभ केला. ती म्ह-
णाली, सुदेवा, दमयंतीची मातोश्री व मी अशा उभयता सख्या बहि-
णी आहों. राज्य संबंधानें चेदि व विदर्भ या दोन्हीं देशांमध्यें वैर अस-
ल्यामुळें दमयंतीला स्वयंवरावांचून मी पुढींच पाहिली नव्हती. माझ्या
बहिणीबरोबर माझा पत्रव्यवहार मात्र चालू आहे. नलराजाबरोबर
दमयंती अरण्यांत गेल्याचें दुःखकारक वर्तमान माझ्या बहिणीकडून
मला समजलें होतें. त्याप्रमाणें सांगून तिनें दासीस आज्ञा केली कीं, दम-
यंतीस न्हाण्याकरीतां पाणी तयार करा. सुगंधिक उटणीं तयार ठेवा. व
जामदारखान्यांतून उंची वस्त्रें भूषणें मागून आणा. सर्व तयारी झाली
म्हणजे मला कळवा. म्हणजे मी तिस घेऊन येतें. कांहीं वेळानें सर्व त-
यारी झाली म्हणून दासी सांगावयास आली. चेदी मातेनें दमयंतीची

हात धरून तिस उठविले. व न्हाऊं घालण्यास घेऊन चालली. परंतु पतीसहवर्तमान राज्याभिषेक झाल्यावांचून मंगलस्नान करावयाचें नाहीं, असा दमयंतीचा नेम असल्यामुळें तिनें मावशीस तसें कळविलें. परंतु तिचें समाधान न होतां ती पुन्हां आग्रह करूं लागली. परंतु दमयंतीनें तें बोलणें मान्य केलें नाहीं. शेवटीं चेदी मातेनें निरुपाय होऊन आणखी चार दिवस राहून जा, ह्मणून आग्रह केला. दमयंतीचा जीव जरी वृद्ध मातापितरांच्या दर्शनाकडे, तेथें गेल्यानंतर पतीचा शोध करण्याकडे, व आपल्या लहान बाळांकडे गुंतला होता तरी आपल्या संकट समयीं हिनें आपणांस आश्रय दिला आहे या कृतज्ञ बुद्धीनें तिनें शेवटीं दोन दिवस रहाण्याचें कबूल केलें. चेदी नगरांत या दोन दिवसांत मोठा उत्साह झाला. अरिष्ट शमनास शेंकडों ब्राह्मण अनुष्ठानास बसविले. सौभाग्य दानें दिलीं. ब्राह्मण भोजनें घातलीं. अशा गडबडींत दोन दिवस केव्हांच निघून गेले. तिसऱ्या दिवशीं दमयंतीच्या प्रयाणाची सर्व सिद्धता झाली. रथ, दास, दासी वगैरे सर्व सिद्धता झाल्यानंतर दमयंती सर्वांस मोठ्या प्रेमानें भेटली. सुनंदेची व तीची फार मैत्री असल्यामुळें, व पुढें ही आपली बहिण कळल्यानंतर या प्रसंगीं तिनेंही दमयंतीबरोबर जाण्याची मातोश्रीपासून रजा घेतली. नंतर दमयंतीची तिनें ओटी भरून, सर्व प्रकारचे अलंकार, एक सुंदर भरगच्ची शालू आणि एक रत्न जडीत कंचुकी तिस दिलीं. सर्वांचीं वंदनें वगैरे शिष्टाचार झाल्यानंतर सर्वांचा निरोप घेऊन दमयंती सुनंदेसह रथांत जाऊन बसली. सुदेव ब्राह्मणासही बक्षिस देऊन दमयंतीस सांभाळून नेण्याविषयीं सांगितलें. दमयंती आतां जाणार असें पाहून सर्वांनीं आक्रोश आरंभिला. शेवटीं सुदेवानें सर्वांचें शांतवन करून रथ हांकण्याविषयीं सारथ्यास आज्ञा केली. कांहीं अंतरापर्यंत सर्व लोक पोंचवीत होते. शेवटीं दुःखित सर्व मागें फिरले.



वाचणार समस्त भगिनींनो, एकनिष्ठ पातिव्रत्याचा काय महिमा हे, याचें उदाहरण तुह्मी दमयंतीवरून घ्या. अजगराच्या व फांसे पारध्याच्या हातांत दमयंती लागल्याचें वाचतांना तुह्मांस या पुढील भाग्योदयाची आशा वाटत होती काय? परंतु बलाढ्य पातिव्रत्यानेंच तिचें संरक्षण केलें. अबला ह्मणणाऱ्या स्त्रियांजवळ हें दिव्यास्त्र किती बरें प्रखर आहे !!! भगिनींनो ! याचा सांभाळ करून वागणाऱ्या स्त्रियांपुढें कोणत्या बरें दुःखाची प्रौढी चालणार आहे? यास्तव याचा सर्वांनीं सांभाळ करून आपणांस सुखी करून घ्यावें, असें मी मनापासून इच्छितों.

---

## भाग ४ था

सुदेव आणि दमयंती विदर्भ देशास जात असतां मार्गांतील मांडलिक राजांस, दमयंतीचें वर्तमान कळतांच, त्यांनीं सामोरें यावें, सत्कार करावा, व बरोबर कांहीं सैन्य द्यावें. असें होतां होतां विदर्भ देशास पोंचेपर्यंत दमयंती बरोबर इतका समाज जमला कीं, तो ऐकून भीमक राजास प्रथम परचक्र आलें कीं काय असा भास झाला. परंतु जासूदानें दमयंती आल्याचें वर्तमान कळवितांच त्यास विलक्षण आनंद झाला. मंत्रीमंडळास बोलावून सर्व नगरींत गुड्या तोरणें उभारण्यास हुकूम दिला. मंगल वाद्यें वाजूं लागलीं. अपराधी बंधमुक्त केले. नंतर भीमक राजानें मोठ्या थाटानें मंत्री मंडळासह कन्येस सामोरा गेला. या प्रसंगीं विदर्भ देशांत जो समारंभ व आनंद दृष्टीस पडला तसा पूर्वीं कधीं पाहिला नव्हता. असो. अशा थाटानें भीमक राजाची व दमयंतीची भेट झाली. दमयंतीनें पित्याच्या चरणीं मस्तक ठेविला. भिमकास इतका आनंद झाला कीं, प्रेमाश्रुमुळें त्यास दमयंतीचें मुख देखील दिसेना. दमयंतीनें पित्याचे पाय व त्यानें तिचा मस्तक असें आपापल्या प्रेमा-

श्रमी म्हणून टाकिलें. भीमकानें कन्येस उचलून घट्ट पोटाशीं धरिलें. कांहीं वेळपर्यंततर त्याच्या मुखांतून शब्द देखील निघेना. नंतर कांहीं वेळानें दमयंतीच्या मुखावरून हात फिरवून म्हणतो, बाई दमयंती! वृद्धापकाळीं आम्हांस दुःख देण्यास तुला कांहींच कशी शंका वाटली नाहीं? अगे तुझ्या सारख्या सुशिक्षित कन्येनें आम्हांस इतकें दुःख दिलें, त्यापेक्षां आमचें दुर्भाग्य तें कोणतें? बेटा, उभयतां मुलांस इकडे पाठवून जेव्हां अरण्यांत गमन केलेंस त्यावेळीं तुझीं वृद्ध मातापितरें दुःख करून व्याकूळ होतील हा विचार तुझ्या मनांत कसा आला नाहीं? याप्रकारें भीमकराजानें नानाप्रकारें विलाप केल्यानंतर स्वारी कांहीं वेळानें नगरांत आली. मार्गामध्यें दमयंतीस अवलोकन करण्यासाठीं लोकांची इतकी गर्दी जमली होती कीं, घरावरील कौलें ही दिसतनां. दमयंतीचा पोषाख साधा असून खुल्या अंबारींत बसल्यामूळें सर्व लोकांस एकसारखी दृष्टीस पडत होती. पुढें स्वारी राजवाड्यांत पोहचल्यानंतर शिष्टाचाराप्रमाणें कित्येक मंगलविधि झाले. इतक्यांत दमयंतीच्या दोन्ही मुलांस दाईनें दमयंतीच्या स्वाधीन केलीं. वांचणार हो! आईची ममता मुलांवर किती असेल याविषयीं तुम्हांस निराळें सांगितलें पाहिजे असें नाहीं. साधारण पशुपक्ष्याकडे पाहिलें तरी खात्री होते. मग दमयंतीसारख्या मातोश्रीस किती कळवळा आला असेल याचें अनुमान करणें सहज आहे. तिनें त्या दोघांस मांडीवर घेतलें, चुंबन केलें, अंगावरून हात फिरविला. इतक्यांत हीच आपली आई अशी मुलांची खात्री होऊन तीं कोमल शब्दांनीं बोलूं लागलीं. अहाहा! काय त्या आनंदास पहावयाचें आहे. मुलांच्या तोंडून जें अक्षर निघे तें समयीं तिस केवळ अमृताच्या घोटाप्रमाणें वाटे. मुलांच्या प्रत्येक शब्दापासून तिला पूर्वीचें सुख, मधील



दुःख प्रस्तुत प्राप्त झालेली स्थीति असे तिन्हीं अवस्थांचे विचार मूर्तिमंत दिसत. असो. कांहीं वेळानंतर इंद्रसेन म्हणतो:—

**इंद्रसेन—** आई, इतके दिवस तूं आम्हांला टाकून कोणीकडे गेली होतीस? आम्ही रोज तुझी आठवण काढावी, रडावें, तरी आम्हांला कोणीच सांगत नसे. खरेंच सांग तूं कोणीकडे होतीस?

इंद्रसेनाचें हें भाषण ऐकून दमयंतीचें मन एकदम फाटून गेलें. व मोकळ्या गळ्यानें रडूं लागली. वांचकहो, खरेंच सांगा लहान मुलाच्या या बोलण्यावर कोणता बरें जबाब सुचेल? शेवटीं दमयंती मोठ्या कष्टानें म्हणाली, बाळांनो, या अपार सौख्याचा उपभोग घेण्यापुरतें आमचें पुण्यच नाहीं, मग आमचा काय बरें उपाय आहे? इतकें बोलून बोलून स्तब्ध राहिली. कांहीं वेळानंतर भीमक राजा येऊन पहातो तों कन्या स्वस्थ बसली आहे असें पाहून तो तिचें समाधान करून म्हणतो:- बाईग, झाल्या गोष्टीस काय बरें उपाय आहे? परमेश्वर ज्या स्थीतींत ठेवील, तींत रहाणें हेंच आपलें कर्त्तव्य आहे. मग असा उदासपणा धरून दुःख करीत बसल्यानें मजला काडीभर तरी सुख होईल काय? तर बेटा असें करूं नको. दोन मुलें आहेत. भावंडें आहेत. आम्हींही दोघें पिकलेलीं पानें आहों. यांजकडे पहा आणि मजला आवर घाल. याप्रमाणें पुष्कळ समाधान केलें तरी उपयोग काय? प्रलय कालच्या मेघाच्या धारा वस्त्रानें निवारतील काय? त्यांच्या प्रेमास प्रियवस्तूवांचून दुसरा कोण बरें प्रतिबंध करणार आहे? पित्याचें भाषण श्रवण केल्यानंतर दमयंतीनें मोठ्या मर्यादेनें उत्तर दिलें " बाबा, आपणांस दुःख द्यावें असें मी अगदीं इच्छित नाहीं. परंतु काय करूं. महाराजांचें स्मरण झालें म्हणजे जीव कासावीस होतो, त्याला माझा काय बरें इलाज आहे? ज्या पुण्य

लोकाचें नायक ऐकून इंद्रादि देव सन्मान देतात, ज्याच्या नामस्मर-
णानें पतकी लोक कृतार्थ होतात, फार तर काय पण पशु, पक्षी, वृक्ष
चेतन हीं ज्यांच्या कीर्तीचा गौरव गातात त्या महाराजांचा वियोग कि-
ती दिवस बरें सहन करूं? देवा, ज्या स्त्रिपुरुषांमध्यें एक पळ देखी-
ल वियोग झाला नव्हता, तीं स्त्रिपुरुषें आज कित्येक दिवस वियोग
सागरांत बुडत आहेत यापेक्षां तुझें क्रुरपण तें किती सांगावें? आज-
पर्यंत तुला न्यायी समजत होतें, पण आतां माझी खात्री झाली की,
तुजसारखा कपटी तूंच आहेस. पुष्कराच्या तपश्चर्येनें वश होऊन
त्याजपाशीं आह्मांला दुःख देण्याचें कबूल केलें अससील. आहारे
पक्षपात्या, कोणत्या मुखानें तुला "विश्वंभर, दिनानाथ" इत्यादि
विशेषणें दिलीं असतील ती असोत. अरे निषधवंश, नलराजा, -
त्याचे गुण व पराक्रम इत्यादि गोष्टी आणि त्याला अज्ञातवास प्राप्त
झालेली गोष्ट या जर एकाद्या न्यायी मनुष्यापुढें ठेविल्या तर त्या-
सर्वांचें आदी कारण जोडी त्याला तो न्यायाधिश काय म्हणेल बरें?
तुला तुझ्या प्रिय पदार्थाचीच शपथ आहे. सांग पाहूं. महाराजांनीं
तुझ्या नियमाविरुद्ध कोणतें आचरण केलें? तर आतां एवढें तरी
कर कीं, महाराजांपाशीं मला घेऊन जा. याप्रकारें दमयंतीचा विला-
प पाहून भिमकास जें दुःख झालें त्याचें वर्णनही होणार नाहीं.
बिचारा वृद्ध कन्येस मांडीवर घेऊन तिचें समाधान करून म्हणतो,
बेटा, तुला एकटी व्रतस्थ पहाण्यांत मला सुख का आहे? पण
काय करूं. ज्याप्रमाणें तुझ्या शोधासाठीं ब्राह्मण गेले त्याप्रमाणें
नलराजाचा शोध चालला शोध चालला आहे. प्रारब्धानुसार स-
फल होईल तेव्हां खरें. तुला एकादा निश्चित देश किंवा स्थळ ठा-
ऊक असल्यास सांग. मी आपला एका पायावर जाण्यास तयार-



आहें. पित्याचें भाषण ऐकून दमयंती म्हणते, बाबा, नलराजा सारखा
नराजा प्रत्यक्ष रुपानें कां वास करणार आहे? पूर्वेचा सूर्य पश्चिमेस उग-
वेल, परंतु नलराजा मानी स्वभावास कधींही कलंक लागूं देणार नाहीं. पूर्व रु-
पानें जर महाराज असते, तर आजपर्यंत आपणास बातमी लागली असती.
याप्रमाणें उभयतांचा संवाद चालला आहे, इतक्यांत प्रधान व पुरोहित प्रा-
प्त झाले. पुरोहितास पहातांच त्यास दमयंती विचारते कीं, क्षत्रिय कन्येनं
पुन्हां स्वयंवर करण्यास प्रत्यवाय आहे कीं काय? दमयंतीचें भाषण ऐकून
पुरोहितानें अडचण नाहीं म्हणून सांगितलें. पुरोहिताची आज्ञा मिळतांच
दमयंती त्यांस म्हणते कीं, महाराजांचा अयोध्येस असण्याचा फार संभव आ-
हे. तर पाहिजे तसें करून अयोध्येस व त्याच्या आसपास बातमी फिरवावी कीं,
भीमकराजा कन्येचें पुन्हां स्वयंवर करणार आहे. अशी बातमी प्रसिद्ध झाल्या-
वर महाराज जर तेथें असतील तर, तत्काळ येतील. एक दिवसामध्यें इतकें
लांब येण्यास महाराजांवांचून इतरांचें बिलकूल सामर्थ्य चालणार नाहीं. का-
रण अश्वविद्येंत निपुण असे सर्व पृथ्वींत महाराज एकटे आहेत. दमयंतीचें
भाषण ऐकून भीमकानें तत्काळ दुतांस बोलावून अयोध्येस व अयोध्येच्या
आसपास हें वर्तमान कळविण्याकरितां रवाना केले.

दुसऱ्या दिवशीं अस्तमानाच्या सुमारास एक दुत अयोध्येस प्राप्त झा-
ला. व त्यानें ऋतुपर्णराजास दमयंतीच्या स्वयंवराची गोष्ट कळविली. ऋ-
तुपर्ण राजा मोठा धार्मिक व दयालु होता. त्यास प्रारंभीं ही गोष्ट खरी वा-
टेना. तो मनांत विचार करूं लागला "हे घडेल तरी कसें, दमयंती सारखी
महापतिव्रता पुन्हा स्वयंवर करण्याविषयीं प्रवृत्त झाली हें केवढें आश्चर्य?
बरें नलाच्या गुप्तपणासही फार दिवस झाले नाहींत. तेव्हां यांतील उद्देश का-
य असावा बरें? अशा नानाप्रकारच्या कल्पना करून शेवटीं त्यानीं आले-
ल्या ब्राह्मणास विचारिलें "कांरे दमयंती पुन्हां स्वयंवर करणार ही गोष्ट

लोकणी सांगितली." ब्राह्मणानें सांगितलें कीं प्रत्यक्ष भीमकराजाच्या तों-गानें अक्षरें आहेत. व तयारीही कडेकोट चालविली आहे. हें ऐकून ऋतु-पर्णास परमानंद झाला. परंतु एका दिवसांत विदर्भ देशास जावें कसें. याचें मा-तां अनुमान त्याला होईना. शेवटीं त्याला बाहुकाची आठवण झाली. त्यानें त्या-स बोलाऊन सर्व वर्तमान निवेदन केलें. खरोखर म्हटलें तर या वर्तमानानें नलाचे अंतःकरणाची स्थीति कशी होईल बरें? परंतु दमयंतीच्या प्रीतीचें, गुणांचें, व चातुर्याचें पूर्ण प्रतिबिंब नलाच्या अंतःकरणावर दृढ ठसलेलें असल्यामुळें त्यास विषाद न वाटतां, उलटा आनंद झाला. बाहुकाची सिद्धता पाहून ऋतुपर्ण राजानें चपल अश्व जुंपून रथ सिद्ध करण्यास आज्ञा केली. बाहुकानें अश्वशाळेंत जाऊन दोन रोडके अश्व रथास जुंपिले. हें पाहून ऋतुपर्णास पराकाष्ठेचा संताप आला. आणि म्हणतो, मुर्खा मा-झ्या स्करवाच्या झाडावर कुऱ्हाड मारण्याचा तुझा विचार दिसतो. अरे, या घोडयांच्यानें एक योजन तरी मजल येईल काय? राजाचें असें रागाचें भाषण ऐकून, बाहुक मोठया नम्रतेनें म्हणतो :— महाराज याची आप-ण कां बरें काळजी करता! आपल्या नियमीत वेळापूर्वीं आपण विदर्भ देशास पोंहचलों नाहींतर मला पाहिजे ती शिक्षा करावी." असें म्हणून न-लानें घोडयाच्या अंगावर हात फिरवितांच ते वायु वेगानें गमन करूं-लागले. पुढें ऋतुपर्णानें नलापासून अश्व विद्या शिकून त्यास अक्ष विद्या दिली. नलाची आणि कलीची भेट झाली. कलीनें नलास आशि-र्वाद दिला व त्याच्या आज्ञेनें बिब्याच्या वृक्षांत राहिला. असो. रथ-वायुवेगानें चालत असतां सायंकाळच्या सुमारास विदर्भ नगरास पों-हचले

इकडे दमयंतीस ऋतुपर्ण राजा आल्याची बातमी कळतांच, नलाविषयीं तिची पूर्ण खात्री झाली तिनें दासीस सांगितलें कीं, तूं जा आणि महाराजांचा शोध करून ये. धात्रीनें नमस्कार कर-ती केली कीं, महाराजांस कोणत्या चिन्हांवरून ओळखावें तेंच ठाऊक नाहीं तर उपयोग नाहींतर मी काय करूं? धात्रीचें भाषण ऐकून दमयं-ती म्हणाली, गुडघ्याखालीं हात पोंहचतात, कान फार मोठे आहेत, कृष्णवर्ण आहे, तेज फार आहे, बोटें चोवीस आहेत, व अग्नी उदकावांचून स्वयंपाक करितात. याप्रमाणें लक्षणें ध्यानांत धरून दासी बाहुका जवळ आली आ-णि दमयंतीनें सांगितल्याप्रमाणें सर्व खुणा पाहून हाच नल अशी ति-ची खात्री करून घेऊन दमयंतीकडे गेली. दमयंतीनें तिचे मुखचर्येव-रून कार्यसिद्धि आहे असें अनुमान करून तिस विचारिलें, "कसें का-य बाई, कांहीं यत्न सफळ होणार काय?" हें ऐकून दासी म्हणते, बाई साहेब, आपण सांगितलेल्याप्रमाणें सर्व खुणा मी तपासून पाहिल्या. त्याजवरून हेच महाराज अशी माझी खात्री झाली. त्यास नांवही विचार-तां त्यानें बाहुक असें सांगितलें. तर बाई साहेब, आतां विलंब न करि-तां दर्शनास चलावें.

दासीचें हें भाषण ऐकतांच दमयंतीला जो आनंद झाला असेल त्याचें अनुमान वाचणारच करतील. तथापि ती विचार करून म्हणाली "बाई ग एवढयावरच भेटीला जाणें योग्य नाहीं. सर्व मोहापेक्षां अप-त्यांचा मोह फार चमत्कारिक आहे. यासाठीं हीं दोन्हीं बाळें त्याजपाशीं घेऊन जा. आणि यावेळेस जें घडेल, त्याजवरून अगदीं निदानचा प-रिक्षा होईल दासीनें बाळें अश्वशाळेंत नेली. बाहुकानें मुलांकडे अव-लोकन करतांच त्याला जें भरतें आलें, त्यापुढें बिचारा विवेक करतो काय? शेवटीं कोणताही उपाय न होतां त्या दोन्ही मुलांस मांडीवर घेऊन तो मोकळया गळयानें रडूं लागला. हें पाहून धांवत दासीनें जाऊन हें वर्तमान दमयंतीस निवेदन केलें. यावेळच्या दमयंतीच्या आनंदास

लोकर व्हावयाचें आहे ? तिला नलराजाचें मुख, तेज, गुण इत्यादि मूर्तिमानें दिसूं लागलीं. असो. इकडे दमयंती नलाचे भेटीस अश्वशाळेंत येऊं चल्ये तो इकडे राजा नल आपल्या अंगावरील रूपाच्छादक वस्त्र ( कर्कोट नागानें दिलेलें ) फेंकून देऊन "दमयंती" शब्दानें आक्रोश करित आहे, असें तिच्या दृष्टीस पडलें. दमयंतीनें एकदम जाऊन त्याच्या गळ्यास मिठी मारिली उभयतांची नजरानजर झाल्यावर जें प्रेम दिसलें, तें प्रत्यक्ष पहाण्यास आपण असतों तर खरोखरच मानवी देहाचें सार्थक झालें असतें. उभयतां कांहींवेळ स्तब्ध राहिल्यानंतर नलराजा दमयंतीस ह्मणाला, तुझ्या बरोबर माझी अशी वर्त्तणूक ऐकून सर्व जन मला दुष्ट ह्मटल्यावांचून रहाणार नाहीं. यास्तव कृपाकरून माझ्या अपराधांची क्षमा कर. व एकवार मला "प्राणप्रिय" हें संबोधन दे नलाचें हें भाषण ऐकतांच, दमयंतीस अतिशय वाईट वाटून बोलूं लागली, ' महाराज हें काय बरें भाषण करतां ? या दुष्ट करितांच महाराजांस त्रास झाला आहे हें मी पक्कें समजतें. तर त्याची आणि महाराजांच्या शोधाकरितां पुन्हां स्वयंवर करण्याची जी खोटी वार्त्ता उठविली तिची क्षमा करून दासीचा अंगिकार करावा. अशीं उभयतांचीं भाषणें चाललीं आहेत, हें वर्त्तमान ऐकून भीमक व ऋतुपर्ण हे ही भेटावयास प्राप्त झाले. भीमकानें जामातास गाढ आलिंगन दिलें. नगरांत मंगल वाद्यांचा गजर होऊं लागला. ऋतुपर्णानें हात जोडून नलाची प्रार्थना करून ह्मटलें, महाराज आपणांस न ओळखितां आजपर्यंत आपणांवर स्वामित्व चालविलें, आपल्या हातून सेवा घेतली यासर्व अपराधांची क्षमा करावी. ऋतुपर्णाचें हें भाषण ऐकून नलास फार वाईट वाटलें. तो ह्मणाला, आपण ह्मणता हें शोभतें काय ? माझ्या संकटकाळीं मला आश्रय दिला. यापेक्षां माझें प्रियतें आणखी काय करावयाचें आहे ? भीमकाला असा जामात मिळाला त्याबद्दल परमेश्वराचे आभार मानिले. शेवटीं ऋतुपर्णानें नलास सांगितलें कीं, मी आपणां बरोबर येतों. आपण पुन्हां पुष्कराबरोबर द्यूत क्रीडा करावी. नलानें हें भाषण ऐकून मान्य केलें. असो. निषधदेशास जाण्याचें ठरल्यावर भीमकानें पूर्वीप्रमाणेंच आंदण दिलें भीमकानें नलराजास छत्रचामरादि राजैश्वर्य अंगिकारण्याविषयीं फार आग्रह केला. परंतु धार्मिक नलानें तें भाषण मान्य केलें नाहीं. सरासरी साध्या थाटानेंच स्वारी निघाली. निषधदेशाच्या सिमेपर्यंत सर्व परिवारासह पोंहचल्यानंतर एका जासुदाबरोबर पुष्करास सांगून पाठविलें कीं "पुन्हां एकवार उभयतां द्यूत खेळावें अशी इच्छा आहे." नलाचा निरोप मान्य करून पुष्करानें त्यास आमंत्रण पाठविलें. नल ही कांहीं निवडक लोकांसह तेथें गेला. उभयतांच्या प्रतिज्ञा होऊन खेळ असतां, पुष्करानें संपूर्ण द्रव्य तर गमाविलें. शेवटीं राज्याच्या स्वामित्वाची हि प्रतिज्ञा नलानें जिंकिली. संपुर्ण राज्य व संपत्ति नलास प्राप्त झाली बरोबर प्रजाजनांनीं जयजयकार केला. पुष्कर अंतःकरणांत खिन्न होऊन जाऊं लागला. तेव्हां नलराजानें त्यास कांहीं जाहागीर देऊन राज्यांत ठेऊन घेतलें. नलास यथाविधी राज्याभिषेक झाल्यानंतर सर्व राजे नजराणें घेऊन प्राप्त झाले. देवांनीं पुष्पवृष्टि केली. ब्राह्मणांनीं अशिर्वाद दिले. व प्रजेनें जयजयकार केला.

वाचणारहो ! ज्या कथेस मी आरंभ केला होता तिचा येथें शेवट झाला. यांतील दोषांकडे लक्ष न देतां ग्रंथ गोड मानून घ्यावा येवढी प्रार्थना आहे. यांतील सारांशाकडे लक्ष देऊन त्याप्रमाणें

दपर्यो

लोक ठवल्यास जेनाते थाडा बहुन- फायदा झाल्यावांचून रहाणा-
गाने . ही माझी खात्री आहे .

चे

तो

# या पुस्तकास आश्रय देणारांची नांवें.

| रा | नावें | प्रति | | नांवें | प्रति |
|---|---|---|---|---|---|
| १. | वासुदेव रामचंद्रजी | १ | रा०रा | रामचंद्र लक्ष्मण | १ |
| २ | नाना भाई अनंताजी | १ | ॥ | दामोधर बालकृष्ण धोत्रे | १ |
| | शामराव नारायणजी | १ | ॥ | दत्ताराम गणेश भाउारकर | १ |
| ॥ | श्रीकृष्ण माधवरावजी | १ | ॥ | दिनानाथ रघुनाथजी | १ |
| ॥ | नानाजी गोविंदजी | १ | ॥ | मुकुंदराव भाऊ | १ |
| ॥ | जनार्दन राघोबा | १ | ॥ | रामकृष्ण सखाराम | १ |
| ॥ | पांडुरंग कासीनाथ | १ | ॥ | गणपतराव विश्वनाथजी | १ |
| ॥ | विनायक माधवराव | १ | ॥ | मदन कृष्णाजी पाटील | १ |
| ॥ | बापुजी जगन्नाथजी | १ | ॥ | बापुजी हरिश्चंद्रजी | १ |
| ॥ | लक्ष्मण माणिकजी | १ | ॥ | वामन नारायण चौबळ | १ |
| ॥ | रुद्र दामोदरजी | १ | ॥ | नारायण वासुदेव शिवलकर | १ |
| ॥ | बी० बी० फरधर | १ | ॥ | शांताराम नारायण वकील | १ |
| ॥ | पांडुरंग कान्होबा | १ | ॥ | रामचंद्र नारायण | १ |
| ॥ | रामचंद्र के- देसाई | १ | ॥ | विष्णू जे- पागनीस | १ |
| ॥ | अनंतराव बापूजी मोहिते | १ | ॥ | आत्माराम वासुदेव | १ |
| ॥ | रामचंद्र गोविंदजी | १ | ॥ | विनायक विश्वनाथ पाटील | १ |
| ॥ | दिनानाथ मदनजी | १ | ॥ | नारायण बिन तुकाराम माळी | १ |
| ॥ | त्रिंबक हरबाजी | १ | ॥ | विश्वेश्वर विठ्ठल | १ |
| ॥ | हरिचंद्र शंकर | १ | ॥ | बलवंतराव नाना मोरोजी | १ |
| ॥ | कृष्णराव राघोबा | १ | ॥ | भाई रुद्रजी कीर्तिकर | १ |
| ॥ | रामचंद्र हारजी | १ | ॥ | रामजी हिरजी सावंत देसाई | १ |
| ॥ | पुरुषोत्तम आपाजी | १ | ॥ | दत्ताराम कासीनाथ भिसे | १ |
| ॥ | नारायण हिराजी | १ | ॥ | गोपाळ व्यंकटेश | १ |
| ॥ | हरिश्चंद्र रामकृष्ण | १ | ॥ | सखाराम भिकू | १ |
| ॥ | सिताराम बापूजी | १ | ॥ | मोराभाई रघुनाथजी | १ |
| ॥ | बापूजी पांडुरंगजी | १ | ॥ | नागु धर्माजी पाटील | १ |
| ॥ | दामोदर बी- पनडुकर | १ | ॥ | गोविंद मोरेश्वर फटक | १ |
| ॥ | नारायण केशवजी | १ | ॥ | दत्ताजी रामचंद्र नाडकर्णी | १ |
| ॥ | जगन्नाथ मंगेश | १ | ॥ | सखाराम रावजी | १ |
| ॥ | रामचंद्र सदाशिवजी नाईक | १ | ॥ | रावसा- घनश्याम निळकंठ | १ |
| ॥ | नारायण केरोबा | १ | ॥ | भगवंत पांडुरंग लाड | १ |
| ॥ | रावजी पांडुरंगजी | १ | ॥ | दत्ताजी लक्ष्मण | १ |
| ॥ | नारायण मुकुंदराव | १ | ॥ | विष्णू बाबाजी | १ |
| ॥ | पांडुरंग बापू वर्दे | १ | ॥ | कृष्णाजी रघुनाथ पाध्ये | १ |
| ॥ | नि सोबा माणकजी | १ | ॥ | बाळकृष्ण विठ्ठल | १ |
| ॥ | जनार्दन पुरुषोत्तम | १ | ॥ | गणपतराव आर- चोगळे | १ |
| ॥ | विठ्ठल बाळकृष्ण | १ | ॥ | हरिश्चंद्र भाऊ | १ |
| ॥ | अनंत भास्कर ठाकूर | १ | | गोविंद विश्वनाथ चुलेकर | १ |